CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि.२५ फेब्रुवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १४८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# ‘झाडू’ने घेतली ‘मशाली’ची भेट

✔ सुराज्य/सोलापूर

**समोर बलाढ्य शक्ती असतानाही दिल्लीचे तख्त राखणाऱ्या ‘झाडू’ने शुक्रवारी मुंबईत आल्यानंतर वाट वाकडी करून थेट ‘मातोश्री’ गाठली. सत्तासंघर्षात सर्वकाही गेल्यानंतरही अस्मितेसाठी धडपडणाऱ्या ‘मशाली’ भेट घेतली. त्यानंतर राज्यात नवीन राजकीय समीकरण उदयास येऊ पाहत आहे. त्यासंदर्भातही ‘प्लीज वेट’ असा सूचक संकेत देत ‘शेवटी सत्याचाच विजय होईल’, असे सांगत ‘सोबत लढण्यासाठी नाही तर सोबत शिकण्यासाठी आलो आहे’, असे स्पष्ट करत आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान यांनी उध्दव ठाकरे यांच्या ‘मशाली’ला साथ देण्याचे सूतोवाच केले.**

## ‘आप’ने ‘मातोश्री’ गाठली थेट, युतीबाबत म्हणाले, ‘प्लीज वेट’




शुक्रवारी दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंतसिंग मान हे मुंबईत एका कार्यक्रमासाठी आले होते. यावेळी या दौऱ्यातून वेळ काढत त्यांनी ‘मातोश्री’ निवासस्थानी उध्दव ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीनंतर केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर हल्लाबोल करत महाराष्ट्रात आम आदमी पक्ष उध्दव ठाकरे यांच्यासोबत असल्याचे संकेत दिले. या भेटीत अनेक विषयांवर चर्चा झाली असून ही भेट पूर्णत: राजकीय असल्याचे सांगण्यात आले. या भेटीनंतर महाराष्ट्रात ठाकरे गट आणि आम आदमी पार्टीची युती होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. अरविंद केजरीवाल ‘मातोश्री’वर कशासाठी आले आहेत? हे वेगळे सांगण्याची गरज नाही, असे सूचक विधान करून उद्धव ठाकरे यांनी भविष्यात ‘मशाल व झाडू’ एकत्र येणार असल्याचे संकेत भेटीनंतर घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत दिले. कोरोना काळापासून उध्दव ठाकरे यांना भेटायची इच्छा होती. कोरोना काळात आम्ही एकमेकांपासून बरंच काही शिकत होतो. उद्धव ठाकरे यांच्या सरकारने संपूर्ण राज्यासह मुंबईत कोरोनाला नियंत्रणात ठेवले. आम्ही दिल्लीकरांनी मुंबई आणि महाराष्ट्राकडून बरेच काही शिकलं आहे. कोविडच्या काळात हे सरकार अनेक सराव करत होते. ते सराव आम्हीही दिल्लीत करत होतो. त्यावेळी त्यांचे कार्य उल्लेखनीय होते, असे अरविंद केजरीवाल यांनी सांगितले.

### ते आम्हाला घाबरतात, म्हणून...

भाजपला फक्त गुंडगिरी येते. बाकी काही नाही. घाबरट लोक ईडी, सीबीआयचा वापर करतात. त्यांना आमची भीती वाटते, म्हणूनच ते याचा वापर करतात. आम्हाला फरक पडत नाही, सत्याचा विजय होणार आहे. आपण एकमेकांकडून काही शिकू, तेव्हाच आपला देश पुढे जाईल. आपल्याला एकमेकांसोबत लढायचे नसून शिकायचे आहे, असेही सूचक वक्तव्य केजरीवाल यांनी यावेळी केले.

### शेवटी सत्याचाच विजय

मागील काही दिवसात महाराष्ट्रात खूप घडामोडी घडल्या असून अद्यापही घडत आहेत. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची चोरी झाली. त्यांचे चिन्ह आणि नाव चोरी करण्यात आले. उद्धव ठाकरे यांचे वडील वाघ होते. हे वाघाचे पुत्र आहेत. संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्यासोबत आहे. येणाऱ्या सर्व निवडणुकीत उद्धव ठाकरेंचा मोठा विजय होणार आहे. केव्हाही शेवटी सत्याचाच विजय होत असतो, अशा शब्दात अरविंद केजरीवाल यांनी उध्दव ठाकरेंना बळ दिले.

### निवडणूक येईल तेव्हा निवडणुकीचा विचार करू

देशात फक्त एकच राजकीय पक्ष आहे, जो दिवसातील २४ तास निवडणुकांबाबत विचार करतो. आम्ही २४ तास देशाचा विचार करतो. आम्ही देशातील प्रश्नांचा विचार करतो. पण जेव्हा निवडणूक येईल तेव्हा निवडणुकीचीही चर्चा करू. आम्ही राजकीय पक्ष आहोत. निवडणूक तर लढवूच. पण त्या पार्टीप्रमाणे आम्ही २४ तास निवडणुकीचा विचार नाही करत, अशा शब्दात ‘ठाकरे गट- आप’ युतीबाबत केजरीवालांनी भाष्य केले.

### उद्योगपतींच्या फायद्यासाठी देश गहाण

केंद्र सरकार काही उद्योगपतींचा फायदा होण्यासाठी देश गहाण ठेवत आहे. देशातील सर्व संस्थांची विक्री करत आहे. आता एलआयसी पण घाट्यात जाणार आहे. करोडो लोकांनी एलआयसीमध्ये साठवलेल्या पैशांचे काय होणार? देशात इतकी महागाई वाढली आहे की, लोकांना घरचा खर्च भागवता येत नाही. एकीकडे लोकांचा पगार वाढत नाही, दुसरीकडे त्यांच्या खर्चात मात्र मोठी वाढ होत आहे, अशी टीकाही केजरीवाल यांनी यावेळी केली.

## बोलेरोने पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीस्वार ठार

✔ सुराज्य/सोलापूर



सांगोला मिरज या राष्ट्रीय महामार्गावरील सोलापूर सांगली जिल्ह्याच्या सीमेवरील काळू बाळू वाडी या ठिकाणी अज्ञात चार चाकी बोलेरो गाडीने दुचाकी यास पाठीमागून धडक दिल्याने दुचाकी वरील चंद्रकांत जाधव हा जागीच ठार झाला तर मागे बसलेला गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी २४ फेब्रुवारी सकाळी सहाच्या सुमारास घडली

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील भिलवडी रेल्वे स्टेशन येथील चंद्रकांत श्रीकांत जाधव वय २८ व त्याचा मेव्हणा बाबुल रूपसेन गोसावी राहणार बुधगाव तालुका मिरज हे दोघेजण मोटरसायकल नंबर एमएच १० डी एक्स ८० ५२ वरून सांगोला येथे मजुरी कामाकरिता आज सकाळी येत असता सांगोला तालुक्यातील सीमेवरील काळू बाळू वाडी जवळ पाठीमागून अज्ञात पांढऱ्या रंगाच्या बोलेरो गाडीने धडक दिल्याने जाधव हा जागीच मयत झाला तर बाबूलाल गोसावी डोक्याला मार लागल्याने गंभीर जखमी झाला आहे. चारचाकी बोलेरो गाडी न थांबता तसेच निघून गेली.

याबाबत सांगोला पोलीस स्टेशन मध्ये रयत चंद्रकांत जाधव याचा चुलत भाऊ जालिंदर विश्वास जाधव यांनी फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सांगोला पोलीस स्टेशन करीत आहे.

## मोडनिंबमध्ये वऱ्हाडी बसला आग; जीवितहानी नाही



✔ **मोडनिंब** : विवाह सोहळ्यासाठी वऱ्हाड घेऊन आलेल्या एका खाजगी आराम बसला रात्री विवाह स्थळाजवळ थांबल्यानंतर अचानक आग लागली. ही घटना रात्री साडे अकराच्या सुमारास सोलापूर पुणे महामार्गावरील मोडनिंब या गावात घडली आहे. मोडनिंब येथे विवाह सोहळ्यासाठी रात्री ही बस पुण्याहून मोडनिंब ला वऱ्हाडी मंडळी घेऊन आली होती.

व-हाडी मंडळी लग्नाच्या कार्यक्रमासाठी बसमधून उतरली बस बाजूला उभा केली होती. नंतर या बसला आकरा साडे अकरा वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. बसला आग लागुन भडका उडताना बाहेर पाहिले. विवाह स्थळावरील उपस्थित तरुणांनी आग विझविण्यात यश मिळवले. यामध्ये कोणतीही जींवित हानी झाली नाही.

## उपळाई (बु.)परिसरात बिबट्याचा वावर

▸ **वनविभागाकडून खबरदारी घेण्याचे आवाहन**

शेतात कामे करताना सावधानता बाळगावी, लहान मुले व महिलांना एकटे सोडू नये. उपळाई परिसर हा कोरडवाहू भाग असल्याने दोन ते तीन दिवसांत बिबट्या या भागातुन निघुन जाईल परंतु तोपर्यंत नागरिकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी.

**- सुरेश कुरळे, वनरक्षक**



✔ **माढा** : गेली दोन ते तीन दिवसांपासून माढा तालुक्यातील उपळाई बुद्रूक, रोपळे खुर्द, वडाचीवाडी (उ.बु) परिसरात बिबट्या सदृश प्राण्याचे दर्शन नागरिकांना होत असल्याने, परिसरात घबराटीचे वातावरण पसरलेले असून, वाड्यावस्त्यावरील शाळांना सुट्टी देण्यात आली आहे. गतवर्षी करमाळा तालुक्यात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, आता माढा तालुक्याच्या परिसरात वावर असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे.

रोपळे खुर्द परिसरात बिबट्या सदृश प्राणी दिसून आला त्यानंतर गेली दोन तीन दिवस वडाचीवाडी व उपळाई बुद्रूक भागातील नागरिकांना नागरिकांना हा प्राणी दिसून येत आहे. याबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वावर असलेल्या परिसरास भेट देऊन पाहणी केली असता.

बिबट्याचेच ठसे असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे बिबट्याचा शोध घेऊन वनविभागाने जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## राज्यपाल नियुक्त आमदारांचे प्रकरण पुन्हा लांबणीवर


▸ **आघाडीची यादी वगळली, शिंदे-फडणवीस सरकारकडून नवी यादी?**

✔ **सोलापूर** : महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाबरोबरच विधान परिषदेवर निवडून द्यावयाच्या राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या प्रकरणाला शुक्रवारी देखील मुहूर्त लागला नाही.यावर सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार होती परंतु ती पुन्हा लांबणीवर पडली. महाराष्ट्रातील राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या प्रकरणात सुप्रीम कोर्टातील सुनावणी आता आणखी लांबणीवर पडली आहे. आता पुढची सुनावणी २१ मार्च रोजी होणार आहे.ही तारीख ठरवतानाच कोर्टाने २१ मार्चपर्यंत राज्यपालांना १२ आमदारांच्या नियुक्त्या करता येणार नाहीत, असे आदेश दिले.महाविकास आघाडीची यादी मागे पडली असून शिंदे-फडणवीस सरकारकडून नव्या यादीची हालचाली सुरू असल्याचे वृत्त आहे.

जून २०२० पासून महाराष्ट्रामध्ये राज्यपाल नियुक्त १२ आमदारांचा प्रश्न राजकीय दृष्ट्या गाजत आहे. त्यावरून राजकीय वातावरणही गरमागरम आहे. महाराष्ट्रातील सत्ता बदलली, पण हे प्रकरण अद्यापही सुरूच आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी याबाबत निर्णय घेत नव्हते. त्यामुळे कोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. तर आता सत्ता बदलानंतर याबाबत एक वेगळी याचिका दाखल झाली आहे. राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून आधीची यादी परत पाठवली, हे कृत्य नियमात बसणारे नाही, असं म्हणत याबाबत कोर्टात आक्षेप घेण्यात आला आहे. विधान परिषदेमध्ये सध्या शिवसेनेच्या डॉ. नीलम गोऱ्हे या सभापती आहेत. सभापती बदलण्यासाठी आवश्यक संख्याबळ अद्यापही भाजपकडे नाही. ते देखील या १२ आमदारांच्या नियुक्तीवर अवलंबून असेल.

कोर्टाने या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलल्यामुळे राज्यपाल नियुक्त १२ आमदारांचा प्रश्न आता आणखी प्रलंबित राहणार आहे.

### महाविकास आघाडीची यादी मागे




महाविकास आघाडी सरकारने राज्यात सत्तेवर आल्यानंतर राज्यपाल नियुक्त १२ सदस्यांची यादी कोश्यारी यांच्याकडे पाठवली होती. पण राज्यपालांकडून या यादीला ना हिरवा कंदील देण्यात आला, ना यादी मंजूर करण्याबाबत कोणतेही भाष्य करण्यात आले. या प्रकरणी राज्य सरकारने न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतरही राज्यपालांनी कोणताच निर्णय घेतला नव्हता. उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देतानाही १२ आमदारांच्या मुद्द्यावरुन राज्यपालांना टोला लगावला होता. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांनी महाविकास आघाडीने दिलेल्या १२ सदस्यांची यादी मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. आता शिंदे सरकारकडून नवीन यादी सादर करण्याची तयारी सुरू झाली आहे. या १२ नावांसाठी दोन्हीकडून जोरदार लॉबिंग सुरु असल्याची चर्चा सुरु झाली आहे.

## ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकामध्ये रंगणार फायनल

✔ **केपटाऊन** : आयसीसी महिला टी २० विश्वचषकात दुसऱ्या उपांत्य फेरीचा सामनाही रोमांचक झाला. यजमान दक्षिण अफ्रिका संघाने इंग्लंडचा सहा धावांनी पराभव करत फायनलमध्ये प्रवेश केला आहे. आता २६ फेब्रुवारी रोजी ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामध्ये फायनलचा थरार रंगणार आहे. दक्षिण आफ्रिका संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात चार विकेट्सच्या मोबदल्यात १६४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तर दाखल धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ २० षटकात १५८ धावांपर्यंत मजल मारू शकला.

## बार्शी ते येरमाळा रोडवर अपघात; जावई-सासू ठार

✔ सुराज्य/सोलापूर

बार्शी ते येरमाळा रोड वडील पाथरी गावाजवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील जावई आणि सासू हे दोघे गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात गुरुवारी दुपारच्या सुमारास घडला.

दिनकर केशव डुमणे (वय २९) आणि त्याची सासू देवकाबाई सीताराम डुहाळे (वय ४५ दोघे रा.जामरुन ता.औंढा जि. हिंगोली) असे मयतांची नावे आहेत. ते ऊस तोडींचे मजुर असून सध्या बार्शी येथे राहण्यास होते. काल गुरुवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास सासू आणि जावई हे दोघे दुचाकी वरून बार्शी ते जामरून येथे आपल्या गावी निघाले होते. येरमाळा रोडवरील पाथरी गावाजवळील विद्युत मंडळाच्या कार्यालयाजवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने दोघेही गंभीर जखमी झाले होते. दोघांना उस्मानाबाद येथे प्राथमिक उपचार करून रात्री सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी दिनकर डुमणे हा रात्रीच मयत झाला. तर तिची सासू देवकाबाई डुहाळे ही शुक्रवारी सकाळी मरण पावली. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली असून प्राथमिक तपास हवालदार चमके करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण स्मार्टसिटीत राहत असल्याचा आपल्याला अभिमान असला पाहिजे !

कल्याण
589-26-268

मेन बाजार
248-47-160

## उध्दव ठाकरे २ मार्चपासून सोलापूर दौऱ्यावर



✔ सुराज्य/सोलापूर

शिवसेना चिन्ह आणि पक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे गेल्यानंतर आता ठाकरे गट चांगला आक्रमक झाला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि खा. संजय राऊत आता पदाधिकाऱ्यामध्ये जोश भरण्याचे काम करत आहेत. त्याचच एक भाग म्हणून उद्धव ठाकरे हे २ ते ४ मार्चपासून सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. त्याच दरम्यान खा. राऊत हे सांगली आणि कोल्हापूर दौऱ्यावर जाणार आहेत. शिवसंवाद अभियानाच्या माध्यमातून उद्धव ठाकरे संपूर्ण जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांशी या दौऱ्यामध्ये संवाद साधणार आहेत.

गुरुवार दिनांक २ मार्च रोजी सकाळी १० वाजता पंढरपूर, सांगोला, माळशिरस मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची बैठक तनपुरे महाराज मठ (पंढरपूर) येथे होणार आहे. याचे नियोजन जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे आणि पूनम अभंगराव यांच्याकडे दिले आहे. त्याच दिवशी सायंकाळी पाच वाजता करमाळा येथे करमाळा आणि माढा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. याचे नियोजन जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे यांच्याकडे देण्यात आले आहे. ३ मार्च रोजी मोहोळ येथील शहाजीराव पाटील सभागृहात सकाळी मोहोळ, मंगळवेढा आणि बार्शी येथील पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. याचे नियोजन जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्याकडे देण्यात आले आहे. त्याच सायंकाळी पाच वाजता सोलापुरात शिवसेना प्रणित महाराष्ट्र कामगार सेनालयाच्या कार्यालयात सोलापूर उत्तर आणि शहर मध्यची बैठक होणार आहे.

याचे नियोजन जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे यांच्याकडे देण्यात आले आहे. तर ४ मार्च रोजी सायंकाळी साडेसहा वाजता दक्षिण आणि अक्कलकोट विधानसभा मतदारसंघाची बैठक गोविंद श्री मंगल कार्यालय येथे होणार आहे. याचे नियोजन जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्याकडे देण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हासंपर्क प्रमुख अनिल कोकिळ यांनी दिली आहे.

CMYK

# एक वर्षानंतर...

युद्ध कुठल्याच देशांना परवडत नाही.पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर विशेषतः युरोप खंडातील देशांना ही अक्कल सूचली. जपानच्या हिरोशिमा आणि नागासकी शहरांवर अणुबॉम्ब टाकल्यानंतर त्याची फळे अमेरिकेला भोगावी लागली.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाकने तीनदा युद्धाची खुमखुमी दाखवली पण त्याचे परिणाम पाकलाच भोगावे लागले.आज स्वतःला बलाढ्य समजत भारतीय उपखंडात दहशत माजवू पाहाणाऱ्या चीनचा व्हिएटनाम या छोट्या देशाने पराभव केलेला होता.भारताने युद्धाची भाषा कधीच केलेली नाही.रशिया-युक्रेन या शेजारच्या राष्ट्रांमध्ये सुरू झालेल्या युद्धाला शुक्रवारी एक वर्ष पूर्ण झाले.वर्षभरात कुणाचा किती विध्वंस झाला याची चर्चा जगाच्या पटलावर झडत आहे.युद्ध लादल्यामुळे जगात रशियाची नाचक्की झाली. सारे जग युक्रेनच्या बाजूने होते.कारण युक्रेन हा तसा दुबळा देश.सर्वच बाजूने खंगलेला देश. दुबळ्यावर तुटून पडणे हे शौर्याचे लक्षण नाहीच.तरी देखील आपल्या ताकतीवर युक्रेनने रशियाला जेरीस आणले हे विशेष. युक्रेनच्या भूमीवर दक्षिण, आग्नेय, पूर्व, ईशान्य आणि उत्तरेकडून रशियन फौजांनी एकतर्फी आक्रमण केले.त्याची कारणे आणि बहाणे अनेक होते. उत्तर अटलांटिक सहकार्य संघटना अर्थात 'नाटो' युक्रेनपर्यंत विस्तारत असल्यामुळे आमच्या देशाची सीमा असुरक्षित बनेल, अशी भिती रशियाला लागून होती. नाटोच्या पंखाखाली युक्रेन येण्याआधीच त्या देशाला धडा शिकवण्याच्या दृष्टीने रशियाने युद्ध पुकारले.२०१४मध्ये क्रिमिया या युक्रेनच्या आणखी एका प्रांताचा ताबा रशियाने घेतल्यानंतरत्या कृत्याला अमेरिकेसह बहुतेक प्रमुख राष्ट्रांनी जुजबी निर्बंध लादण्यापलीकडे फारसा विरोध केला



नव्हता. शिवाय युक्रेननेही तो भूभाग परत मिळवण्यासाठी फारसे प्रयत्न केले नव्हते. त्या थंड प्रतिक्रियेची दखल घेऊनच धाडस दुणावल्याने बहुधा रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी अधिक महत्त्वाकांक्षी आक्रमणाची कृती केलेली असावी परंतु युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या खंबीर नेतृत्वाखाली युक्रेनने रशियन आक्रणाला तिखट प्रत्युत्तर दिले. इंच-इंच भूमीसाठी प्राणपणाने लढा दिला. त्यामुळे डोन्बास प्रदेशाचा बराचसा भाग वगळता उर्वरित युक्रेनवर रशियाला आजही नियंत्रण मिळवता आलेले नाही.सुरुवातीस युक्रेनच्या फौजांच्या अनेक भागांमध्ये पीछेहाट झाली. परंतु कीव्हसारखे राजधानीचे शहर युक्रेनने रशियाच्या कचाट्यात येऊ दिले नाही. पुढे खारकीव्ह, खेरसन या महत्त्वाच्या शहरांमधूनही रशियन फौजांना हुसकावून लावण्यात युक्रेन यशस्वी ठरले. मारियुपोल हे एकमेव महत्त्वाचे शहर आणि बंदर रशियाने जिंकून दाखवले. सध्या रशियाच्या ताब्यात डॉनेत्स्क आणि लुहान्सकचे मोठे भाग, मारियुपोल हे शहर आहे तसेच संपूर्ण क्रिमिया यापूर्वीच रशियाने नियंत्रणाखाली आणला. युक्रेनने अजून पूर्ण ताकदीनिशी प्रतिहल्ला चढवलेला नाही. कारण त्या देशाकडील सैन्यसंख्या आणि सामग्री आहे. रशियाच्या आक्रमणात किंवा पुतिन यांच्या युद्धोन्मादात पूर्वीसारखी धार राहिलेली नाही, हे झेलेन्स्की यांनी ओळखले आहे. परंतु विजयी पुतिन यांच्यापेक्षाही पराभवग्रस्त पुतिन अधिक धोकादायक ठरतील, असा झेलेन्स्की आणि युद्ध विश्लेषकांचा होरा आहे. झेलेन्स्की अजूनही अमेरिका तसेच युरोपिय देशांकडून मिळणाऱ्या सामग्रीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. जर्मनीकडून येत्या काही आठवड्यांमध्ये लेपर्ड-२ रणगाडे मिळतील. अमेरिकेकडूनही लढाऊ विमाने वगळता इतर प्रकारची सामग्री येऊ घातली आहे. पण रशियावर प्रतिहल्ले चढवून त्यांना हुसकावून लावायचे झाल्यास लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे आणि रणगाडे पुरेशा प्रमाणात आणि पुरेशा तत्परतेने मिळणे गरजेचे आहे. ही प्रक्रिया सरळ सोपी नाही, हे युक्रेनचे दुखणे आहे. युक्रेनच्या २० टक्के भूभागावर रशियाचे नियंत्रण असले, तरी लढाऊ विमाने, ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांच्या माध्यमातून युक्रेनच्या अनेक शहरांवर आग ओकण्याचे काम रशियाकडून सुरूच आहे. रस्ते, वीजकेंद्रे, पाणीपुरवठा केंद्रे, शाळा, बाजार अशा स्थानांना लक्ष्य केले जात आहे. त्यामुळे एक तर युक्रेनची शरणागती किंवा रशियाची माघार किंवा युक्रेनचा निर्णायक विजय या तीन शक्यतांनीच युद्ध लवकर संपू शकते. या तिन्ही शक्यता सध्या दुरापास्त असल्यामुळे युद्ध आणखी काही काळ सुरू राहण्याची शक्यताच अधिक आहे. तोपर्यंत लढत राहणे आणि सकारात्मक राहणे एवढेच युक्रेनच्या हातात आहे. दोनही देशांची जिवीत व वित्त हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे. अण्वस्त्रहल्ल्याच्या माध्यमातून युद्धाचा शेवट करण्याच्या थरापर्यंत पुतिन जाणार नाहीत, असे मानले जाते. पण ते युद्धाचा मार्ग अनुसरणार नाहीत, असेही बोलले जायचे, ज्याच्या अखेरीस विपरीत घडले होते. त्यामुळे पुतिन यांच्या अण्वस्त्रांविषयीच्या गर्भित धमकीविषयीची चिंता जगाला लागून आहे.

## शैक्षणिक

# स्वायत्तता पुढच्या पिढीलाही हवी

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्पर्धा परीक्षा देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या लाखांच्या घरात आहे. मात्र नवा अभ्यासक्रम आणि मुख्य परीक्षा वर्णनात्मक स्वरुपाची करण्याचा आणि त्याची अंमलबजावणी २०२३ पासून करण्याचा निर्णय एमपीएससीने जाहीर केल्यानंतर स्पर्धा परीक्षार्थींमध्ये खळबळ सुरू झाली. स्पर्धा परीक्षार्थींमध्ये सरळसरळ दोन गट पडले. नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी २०२३ पासून नको, असे एका गटाचे म्हणणे आहे. तर दुसऱ्या गटाने एमपीएससीच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. २०२३ पासून अंमलबजावणी नको या मागणीसाठी दोन वेळा आंदोलन झाले. शरद पवार, नाना पटोले यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांनी या आंदोलनाला भेट दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकार विद्यार्थ्यांच्या बाजूने असल्याचे सांगत २०२५ पासून अभ्यासक्रम लागू करण्याची विनंती आयोगाला केली आहे. आयोगाने गुरूवारी सरकारचे म्हणणे मान्य केले. एमपीएससीच्या निर्णयाला समर्थन देणाऱ्या गटानेही एकदा आंदोलन केले आहे. त्यामुळे निर्णयाच्या विरोधात आणि समर्थनार्थ अशा दोन्ही बाजू समजून घेणे आवश्यक ठरते.**

अभ्यासक्रम २०२३ ऐवजी २०२५ पासून लागू करण्याबाबत श्रेयस बेंद्रे म्हणतो, की मुलांची मागणी अवास्तव नाही. महाराष्ट्राच्या तळागाळातून स्पर्धा परीक्षा विश्वात येणाऱ्या मुलांच्या या मागणीला विरोधी आणि सत्ताधारी पक्षाचाही पाठिंबा आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू स्वतः विद्यार्थ्यांच्या मागणीचे समर्थन करत असतील तर एमपीएससीने आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करायला हवा होता.निर्णय दिला पण त्याला खूप उशीर केला. स्वायत्ततेच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे ते असेच दुर्लक्ष करणार का? खऱ्याला खोटे आणि खोट्याला खरे ठरवण्याची ताकद या स्वायत्ततेमध्ये आहे, याचा अनुभव विद्यार्थ्यांनी मागील दोन वर्षात एमपीएससीच्या न्यायालयीन प्रकरणांच्या माध्यमातून घेतला आहे. स्वायत्ततेच्या नावाखाली अगदी चुकीच्या उत्तरालाही एमपीएससी बरोबर ठरवू शकते (पिट्युटरी ग्रंथी-राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२) आणि गौताळा हे राष्ट्रीय अभयारण्य नाही हे स्वायत्ततेच्या जोरावरच सिद्ध होऊ शकते (संयुक्त पूर्व परीक्षा २०२०). तसेच स्वायत्ततेच्या आधारावर चुकीच्या उत्तराबाबत हरकती घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडूनच प्रति प्रश्न १४४ रुपये इतके शुल्क आकारते. त्यामुळे एमपीएससी ही




पब्लिक सर्व्हिस कमिशनबरोबरच 'रेव्हेन्यू अर्निंग कमिशन'ची जबाबदारी पार पाडत आहे.

एमपीएससीने नव्या अभ्यासक्रमासाठी अतोनात संशोधन करून, आपल्या तज्ज्ञांना दिवसरात्र कामाला लावून यूपीएससीचा अभ्यासक्रम फक्त नावात बदल करून जसाच्या तसा लागू करण्याचे 'हर्क्युलियन टास्क' म्हणावे असे काम केले आहे. विद्यार्थ्यांचा एमपीएससीच्या नवीन अभ्यासक्रमाला विरोध अजिबात नाही. चार-पाच वर्षापासून जुन्या अभ्यासक्रमानुसार अभ्यास करत असल्याने नवीन अभ्यासक्रम समजून घेण्यासाठी आम्हाला परत एक-दोन वर्ष वेळ द्यावा लागेल. त्यात आमचे मानसिक, आर्थिक, सामाजिक खच्चीकरण होईल. आम्ही चार-पाच वर्षे केलेली मेहनत वाया जाईल. त्यामुळे अभ्यासासाठी वेळ देऊन नवीन अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करावा एवढेच म्हणणे आहे. मात्र ही मागणी म्हणजे स्वायत्ततेवरचा घाला असल्याचे भासवत एमपीएससी दाखवत असलेला आडमुठेपणा अशोभनीय आहे. सध्याच्या परिस्थितीत आयोगाची ना जाहिरात वेळेवर येते, ना परीक्षा वेळेवर होते, ना प्रश्नपत्रिका निर्दोष असते, ना निकाल वेळेवर लागतात, ना प्रशिक्षण वेळेवर होऊन नियुक्ती वेळेवर होते. प्रश्नपत्रिकेत साधा काना, मात्राही चुकीचा नसणाऱ्या यूपीएससीच्या धर्तीवर चालणाऱ्या एमपीएससीच्या प्रश्नपत्रिकेत मात्र १०० पैकी थेट आठ ते दहा प्रश्न आणि पर्यायही चुकीचे असतात. त्यात चुकीचे उत्तर बरोबर देण्याचा अधिकारही एमपीएससीलाच, कारण तेवढी स्वायत्तता आहे ना, असेही श्रेयस बेंद्रेने सांगितले. अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करण्याची मागणी करणाऱ्यांप्रमाणेच २०२३ पासूनच अभ्यासक्रम का लागू करावा, एमपीएससीची स्वायत्तता का महत्त्वाची हे मांडणाराही विद्यार्थ्यांचा एक वर्ग आहे. त्यांच्यापैकीच एक चेतन वागज म्हणतो, की एमपीएससीची स्वायत्तता कायम राहिली पाहिजे. एमपीएससीचा अभ्यासक्रम एमपीएससीच ठरवू शकते. विद्यार्थी, राजकीय नेते, प्रशासक, शिकवणी वर्गचालक यापैकी कोणीही अभ्यासक्रम कोणत्या स्वरुपाचा असावा, हे ठरवता कामा नये. वर्णनात्मक पद्धतीनुसार तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिकाप्रमाणे एमपीएससीने जून आणि जुलै २०२२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रकावर कोणतेही आक्षेप न घेता अभ्यास सुरू केला. स्वायत्त संस्थेची स्वायत्तता संपुष्टात आल्यास घटनात्मक मूल्ये संकटात येतील. घटनात्मक मूल्ये संकटात आल्यास घटनेला काहीच अर्थ राहणार नाही. एमपीएससीची स्वायत्तता केवळ आताच्या पिढीसाठी नाही, तर पुढील पिढ्यांसाठीही अबाधित राहणे आवश्यक आहे.

महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, एमपीएससीने पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम बदललेला नाही. मुख्य परीक्षेच्या अभ्यासासाठी प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा ते सोळा महिन्यांचा कालावधी मिळाला आहे. अभ्यासक्रम मान्य असल्यास केवळ मुख्य परीक्षा तीन-चार महिने पुढे ढकलण्याचा पर्याय असू शकतो. मात्र अभ्यासक्रम थेट २०२५ पासून लागू करण्याची मागणी करणे अवास्तव आहे. समजा, २०२५ पासून नवा अभ्यासक्रम लागू केला, तर त्यावेळीही आताची मागणी पुन्हा होणार नाही याची खात्री काय? कारण नवा अभ्यासक्रम कधीच लागू होऊ द्यायचा नाही, अशा प्रकारची दबकी चर्चा समाजमाध्यमांत सुरू झाली आहे. त्यावेळीही राजकारण होणार नाही याची खात्री काय? वर्णनात्मक अभ्यासक्रमानुसार अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवणी लावावीच लागते असा भ्रम पसवरला जात आहे. पण अभ्यासक्रम सर्वसाधारण स्वरुपाचा असल्याने शिकवणीची गरज नाही असे, युपीएससी म्हणते. शिकवणी वर्गासाठी शुल्क नसल्यास राज्य शासन सारथी, बार्टी, आदिवासी विभाग, महाज्योती अशा विविध संस्थांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती देते. त्यामुळे आर्थिक परिस्थितीची अडचण असल्यास शिष्यवृत्तीच्या जागा वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. युपीएससीच्या धर्तीवर सी-सॅट पात्रतेसाठी ग्राह्य धरण्याची मागणी दळवी समितीच्या शिफारसीमुळेच एमपीएससीने स्वीकारली. तर त्याच समितीने शिफारस केलेल्या वर्णनात्मक पद्धतीच्या अभ्यासक्रमावर शंका घेणे कितपत योग्य आहे, असे चेतन वागजने नमूद केले.

**- चिन्मय पाटणकर**

## टुडेज् ब्लॉग

# धोक्याची घंटा

आपल्या हिमालयाच्या भारतीय बाजूला सुमारे ९९७५ हिमखंड आहेत. त्यापैकी ९०० उत्तराखंडमध्ये येतात. देशातील चाळीस टक्के लोकसंख्येला पिण्याचे पाणी, सिंचन आणि उपजीविकेसाठी संसाधने उपलब्ध करून देणाऱ्या या हिमनद्यांमधून बहुतांश नद्या उगम पावल्या आहेत; पण हिमनग वितळण्याची, तुटण्याची प्रवृत्ती कायम राहिली, तर प्रचंड लोकसंख्येला रोजगार आणि उपजीविकेची पर्यायी साधने उपलब्ध करून देण्याचा पर्याय देशाकडे नाही.

पृथ्वीच्या तापमानवाढीमुळे हिमखंड तुटण्याची प्रक्रिया चालू राहिल्यास समुद्राच्या पाण्याची पातळी वाढेल, यामुळे अनेक लहान बेटे आणि किनारपट्टीवरील शहरे बुडू लागतील. या घटना नैसर्गिक मानल्या जातात की हवामान बदलाचा परिणाम आहेत, याबाबत शास्त्रज्ञांमध्ये अद्याप एकमत नाही. तापमानात वाढ झाल्यामुळे जगभरातील हिमनद्या अतिशय वेगाने वितळत आहेत. त्यामुळे सर्व हिमनदी प्रदेशात नवीन सरोवरे तयार होत आहेत. या सरोवरांच्या क्षेत्रात उद्रेकाची घटना घडल्यास हिमनगांच्या पन्नास किलोमीटरच्या परिघात राहणाऱ्या जगातील १५ कोटी लोकांसाठी मोठा धोका ठरू शकतो. यापैकी निम्मे हिमखंड भारत, पाकिस्तान, चीन आणि पेरूमध्ये आहेत. 'नेचर कम्युनिकेशन्स' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या ब्रिटनमधील 'न्यूकॅसल युनिव्हर्सिटी'च्या शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात म्हटले आहे की, जगातील ५० टक्के लोकसंख्या धोक्यात आहे. म्हणजे ७५ लाख लोक भारतासह या चार देशांमध्ये राहतात. भारतातील ३० लाख आणि पाकिस्तानातील २० लाख लोकांना याचा फटका बसू शकतो. या अहवालात फेब्रुवारी २०२१ मध्ये उत्तराखंडमधील चमोली येथे घडलेल्या घटनेचाही उल्लेख करण्यात आला आहे.

हवामान बदलाचा सर्वात मोठा धोका तिबेटच्या पठारापासून चीनपर्यंत आहे. या भागात ९३ लाख लोक राहतात. ध्रुवीय क्षेत्राबाहेरील एकूण हिमनद्यांपैकी निम्मे पाकिस्तानात आहेत. गिलगिट-बाल्टिस्तान भागात २०२२ मध्ये हिमनदी फुटण्याच्या सोळा घटना घडल्या आहेत; मात्र २०२२ मध्ये पाकिस्तानात आलेल्या पुरासाठी हिमखंड वितळणे किती जबाबदार आहे, हे या अहवालात स्पष्ट झालेले नाही. न्यूझीलंडच्या 'कँटरबरी युनिव्हर्सिटी'चे प्रोफेसर टॉम रॉबिन्सन म्हणतात की, हिमनदी सरोवराचा उद्रेक हा जमिनीच्या त्सुनामीसारखा आहे. त्याचा परिणाम धरण फुटल्यावर निर्माण होणाऱ्या परिस्थितीसारखा आहे. त्याचा सर्वात मोठा धोका हा आहे की, हे संकट कोणत्याही पूर्वकल्पनेशिवाय मोठे नुकसान करू शकते. हवामान बदलाच्या परिणामामुळे बर्फ वितळल्यामुळे तयार झालेल्या सरोवरांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्याच प्रमाणात त्यांच्या पाणलोट क्षेत्रातील लोकसंख्याही वाढत आहे. तलाव फुटल्यामुळे तितका धोका नसून या तलावांजवळ लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे फारसा धोका नसल्याचा तज्ज्ञांचा दावा आहे. भारताच्या हिमालयीन प्रदेशात असलेल्या सतलज नदीच्या खोऱ्यातील हिमनद्या वितळल्यामुळे अशा तलावांची संख्या वाढत आहे, जी भविष्यात पूर आणि विनाशाचा मोठा धोका बनू शकतात.

या तलावांमुळे सतलजचे पाणी वाढून मोठी हानी होऊ शकते. म्हणूनच ही सरोवरे हिमाचल प्रदेश आणि इतर हिमालयीन राज्यांसाठी धोक्याची घंटा आहेत. हिमालयातील चिनाब, बियास, रावी आणि सतलज या चार खोऱ्यांमधील हिमनद्या वितळल्याने तयार




झालेल्या सरोवरांचं निरीक्षण करण्यात देश आणि राज्यातील भूवैज्ञानिक गुंतले आहेत. सतलज नदीच्या खोऱ्यातील हिमनद्या वितळल्यामुळे तलावांमधील पाण्याचे प्रमाण चार ते पाच टक्क्यांनी वाढल्याचे त्यांच्या अभ्यासातून दिसून आले आहे. भविष्यात त्यात वाढ होण्याची अपेक्षा आहे. वाढत्या तापमानामुळे हिमखंड वितळणे आणि तुटणे यामुळे तलावांचा आकार वाढत आहे.शतकानुशतके हिमखंड वितळण्याचे नैसर्गिक स्वरूप नद्यांचे प्रवाह सतत तयार करत आहे.मात्र जागतिकीकरणानंतर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या शोषणावर आधारित औद्योगिक विकास, त्यातून उत्सर्जित होणारा कार्बन यामुळे त्यांच्या वितळण्याची तीव्रता वाढली आहे. एका शतकापूर्वीही हिमखंड वितळत असत; परंतु हिमवर्षावानंतर त्यांची व्याप्ती सतत वाढत गेली. त्यामुळे गंगा, यमुना या नद्या वाहत राहिल्या. १९५० पासून त्यांची श्रेणी वर्षाला तीन ते चार मीटरने कमी होऊ लागली. १९९० नंतर हा वेग अधिक वाढला, तेव्हापासून गंगोत्रीतील हिमनद्या दर वर्षी पाच ते वीस मीटर वेगाने वितळत आहेत. हे टाळण्यासाठी उपाययोजना करायला हव्यात.

**- भास्कर खंडागळे**

# संतांच्या सांगण्यांवर विश्वास ठेवावा

जे दृश्य असते ते आज ना उद्या नाश पावते. दृश्य हे स्वतंत्र नसते. भगवंताच्या अधीन असते. म्हणून, जगात जी जी गोष्ट घडते ती ती भगवंताच्या इच्छेनेच घडते हे आपण ओळखावे. आपला देह दृश्यच आहे आणि त्याला चालविणारा भगवंत देहात आहे; त्याच्या अनुसंधानात राहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे अनुसंधान राहणे भगवंताच्या नामाने साधते, म्हणून तुम्ही सर्वांनी नाम घेण्याचा निश्चय करावा. आपले चित्त नामामध्ये




गुंतले म्हणजे देहाला प्रारब्धाच्या स्वाधीन करता येते. ही युक्ती ज्याला साधली त्याला सुख-दुःखाची बाधा उरली नाही. संतांना देखील त्यांचे प्रारब्ध भोगावे लागते, पण त्यांना देहबुद्धी नसल्याने भोगाचे सुख-दुःख होत नाही. व्यवहाराच्या मार्गाने जात असता भगवंताचे नाम कधी विसरू नये. आपल्या प्रयत्नाला जे फळ येईल ती भगवंताची इच्छा समजून, जे पदरात पडेल त्यात समाधान मानावे.

आपण प्रपंची लोक आहोत, म्हणून प्रपंचाला उचित असणारा प्रयत्न केल्यावाचून कधी राहू नये, पण प्रपंच हेच आपले सर्वस्व आहे हे न समजता, त्यामध्ये भगवंताला विसरू नये. गोंदवलेकर महाराज पुढे असे म्हणतात की, परमार्थाला सदाचरणाची फार जरूरी आहे.

## जनमानस

# लिथियमचा जॅकपॉट

आता निसर्गही स्वावलंबी भारत अभियानासोबत आहे हे निश्चित झाले आहे. असे म्हणण्याचे कारण, देशाला ऐन मोक्याच्या क्षणी इतका खनिज साठा मिळाला आहे, ज्यामुळे भारताचे इतर देशांवरील अवलंबित्व संपुष्टात येऊ शकते. अर्थातच लिथियम चा साठा. देशात पहिल्यांदाच असे खनिज सापडले असून भारतीय भूगर्भीय सर्वेक्षण विभागाने जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील सलाल-हैमाना भागात लिथियमचे साठे शोधून काढले आहेत. या लिथियमचे अंदाजे प्रमाण ५.९ दशलक्ष टन असून या लिथियम साठ्याची किंमत कोट्यवधींमध्ये आहे. ५.९ दशलक्ष लिथियमचा विद्यमान साठा असलेला देश आता आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक मोठे पाऊल टाकणार आहे. सध्या जम्मू-काश्मीर मध्ये सापडलेल्या लिथियमच्या साठ्यातून भारताच्या गरजा पूर्ण होतील आणि त्यासाठी



इतर देशांवर अवलंबून राहावे लागणार नाही. आतापर्यंत फक्त चीन आणि ऑस्ट्रेलिया भारताला लिथियम पुरवठा करतात. सध्या चीन आणि ऑस्ट्रेलिया हे लिथियमचे मोठे पुरवठादार आहेत, पण ते मनमानीपणे करत आहेत, त्यामुळे इलेक्ट्रिकल वाहने चालवण्यात अनेक अडथळे येत आहेत. सर्वात मोठा अडथळा वाहनांच्या किमतीचा आहे. लिथियमच्या अनुपलब्धतेमुळे आपल्याला वाहनांच्या किंमती कमी करता येऊ शकत नव्हत्या. तथापि, आता देशाच्या हातात लिथियमचा साठा आला आहे. लिथियम हे एक रासायनिक तत्व असून सामान्य परिस्थितीत, हा सर्वात हलका धातू आणि निसर्गातील सर्वात कमी घनतेचा घन पदार्थ आहे. रासायनिकदृष्ट्या, हा अल्कली धातू समूहाचा सदस्य आहे आणि इतर अल्कली धातूंप्रमाणेच, अत्यंत प्रतिक्रियाशील आहे, याचा अर्थ लिथियम इतर पदार्थांसह वेगाने प्रतिक्रिया देतो. त्याच्या उच्च प्रतिक्रियात्मकतेमुळे, ते निसर्गात कधीही शुद्ध स्वरूपात आढळत नाही परंतु केवळ इतर घटकांसह संयुगांच्या स्वरूपात आढळते. लिथियम या धातूचा वापर इलेक्ट्रिक वाहनांसाठी बॅटरी बनवण्यासाठी केला जातो.

**- प्रा.विजय कोष्टी**

# आंध्र प्रदेशच्या राजधानीचा वाद

आंध्र प्रदेशच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या विभाजित आंध्र प्रदेशची राजधानी अमरावती असेल, असे जाहीर करण्यात आले होते. त्यासाठी भूसंपादनही झाले होते; परंतु मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी विशाखापट्टण ही नवी राजधानी असेल, अशी घोषणा केली. राजधानीबाबतचा वाद सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना निवडणूक प्रचारात भांडवल करण्यासाठी राजधानीची घोषणा घाईघाईने करण्यात आली असावी, असे दिसते.

राज्याचे राजधानीचे शहर कोणते असावे, हे ठरवण्याचा अधिकार राज्यकर्त्या पक्षाला जरूर आहे; परंतु हे करताना जागतिक आणि देशपातळीवर त्याचे काय अनुकूल, प्रतिकूल परिणाम होतील, नागरिकांच्या राजधानीचे शहर किती सोयीचे आहे हे पाहायला हवे. गेली दहा वर्षे अमरावती हेच राजधानीचे शहर असेल असे गृहीत धरून या राज्यात काम चालले होते. शेतकऱ्यांच्या जमिनीही त्याच कारणासाठी संपादित करण्यात आल्या होत्या. अमरावती हे राजधानीचे शहर होणार असल्याने अनेकांनी गुंतवणूक केली. तिथे उद्योग, व्यवसाय, आस्थापने सुरू व्हायला लागली होती. असे असताना आंध्र प्रदेशची सध्याची राजधानी अमरावती आहे पण नवी राजधानी विशाखापट्टण असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी केल्यामुळे एक नवा वाद निर्माण झाला. दिल्लीत एका आंतरराष्ट्रीय राजकीय बैठकीत बोलताना, त्यांनी ही घोषणा करून सर्वांना चकित केले. वास्तविक, राज्याची राजधानी बदलायची असेल, तर त्याची माहिती अगोदर नागरिकांना राज्यातच दिली जाणे अपेक्षित आहे.

आंध्र प्रदेश आणि तेलंगणा ही दोन राज्ये विलग झाल्यानंतर २०१५ मध्ये चंद्राबाबू नायडू सरकारने अमरावतीला राजधानी बनवले. दोन स्वतंत्र राज्ये झाल्यानंतर हैदराबाद ही दोन्ही राज्यांची संयुक्त राजधानी होती. त्यानंतर २०२४ पर्यंत आंध्र प्रदेशला नव्या राजधानीची घोषणा करायची होती. विशाखापट्टणमध्ये पुढच्या महिन्यात आंध्र सरकारच्या वतीने गोलमेज परिषद आयोजित केली जाणार आहे. या परिषदेसाठी राज्य सरकारने अनेक राजदूत आणि उद्योगपतींना आमंत्रित केले आहे. या पार्श्वभूमीवरच मुख्यमंत्र्यांनी विशाखापट्टणची घोषणा करून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. येत्या काही महिन्यांमध्ये



आंध्र प्रदेशच्या विधानसभेच्या निवडणुका आहेत. या निवडणुकीत चंद्राबाबू नायडू यांनी झोकून दिले आहे. ही आपली शेवटची निवडणूक असून तेलुगू देसम निवडून न आल्यास राजकीय संन्यास घेऊ, असा भावनिक इशारा त्यांनी दिला आहे. दुसरीकडे गेली दहा वर्षे जगनमोहन रेड्डी तिथे सत्तेवर असल्याने त्यांच्याविरोधातही नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती या राजधानीच्या शहरासाठी केलेल्या भूसंपादनात मोठे गैरव्यवहार झाल्याचे आरोप करून, नायडू यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा रेड्डी यांचा प्रयत्न दिसतो. त्यातूनच विशाखापट्टण हे राजधानीचे शहर असेल, अशी घोषणा त्यांनी केली असावी.

वास्तविक, २००२ मध्ये राज्याच्या तीन राजधान्यांचे नियोजन करण्यात आले होते. त्यात अमरावती, विशाखापट्टण आणि कुर्नूल या शहरांचा समावेश होता; परंतु नंतर यात बदल करण्यात येऊन अमरावती हीच राजधानी असेल, असे जाहीर करण्यात आले होते. विशाखापट्टण हे आंध्र प्रदेशमधले सर्वात मोठे शहर आहे. ते भारतातील सतराव्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. वॉल्टेअर आणि विशाखापट्टण ही जुळी शहरे आहेत. वॉल्टेअर एक रेल्वे जंक्शन आहे, तर विशाखाट्टण हे वर्दळीबाबत देशातील पाचव्या क्रमांकाचे बंदर आहे. भारतीय नौदलाच्या 'ईस्टर्न नेव्हल कमांड'चे मुख्यालय तिथेच आहे. चंद्राबाबूंनी अमरावती राजधानी करण्याचा निर्णय घेतल्यामुळेच रेड्डी यांनी त्यावर फुली मारली, हे स्पष्ट आहे; मात्र रेड्डी यांचा पक्ष 'वायएसआरसीपी'ने चंद्राबाबूंवर अमरावतीमध्ये जमीन घोटाळे केल्याचा आरोप केला होता. काही लोकांना आधीपासूनच नव्या राजधानीच्या स्थानाबद्दल माहिती देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर नवीन राजधानी बनवण्यासाठी शेतकऱ्यांकडून घेतलेल्या जमिनी रेड्डी सरकार का विकत आहे, असा सवाल चंद्राबाबू नायडू यांनी उपस्थित केला आहे. विशाखापट्टणचे नाविक आणि व्यापारी महत्त्व लक्षात घेतले तरी अमरावती या राजधानीचे महत्त्व दुर्लक्षिता आले नसते. चंद्राबाबू यांच्या काही निर्णयांमुळे आंध्र प्रदेशची प्रगती झाली हे नाकारता येणार नाही. २०१९ मध्ये अमरावती ही वैधानिक (लेजिसलेटिव्ह) राजधानी असेल, विशाखापट्टण ही कार्यकारी राजधानी असेल तर कुर्नूल ही न्यायालयीन राजधानी असेल, असे सांगण्यात आले होते. त्यासाठी 'डिसेंट्रलायझेशन अँड इन्क्लुझिव्ह डेव्हलपमेंट ऑफ ऑल रिजन्स' हा कायदाही रेड्डी सरकारने मंजूर करून घेतला; मात्र पुढच्याच वर्षी तो मागे घेतला. यावरून रेड्डी यांचीच धरसोड वृत्ती दिसते. ३ मार्च २०२२ रोजी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला. तेलुगू देसम सरकारने 'कॅपिटल रिजन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी' कायद्यांतर्गत अमरावती ही राजधानी म्हणून विकसित करण्याचे ठरवले होते. त्याचे पालन सहा महिन्यांमध्ये करावे, असा आदेश न्यायालयाने दिला. विशेष म्हणजे, अमरावतीच्या उभारणीसाठी दिल्या गेलेल्या जमिनींवरही न्यायालयाने भाष्य केले. राजधानी रयतू परिरक्षण समितीने शेतकऱ्यांची बाजू लढवत रेड्डी सरकारच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिले होते.शेतकऱ्यांनी दिलेल्या जमिनी विकसित करून तीन महिन्यांच्या आत त्यांना परत कराव्यात आणि विकसित भूखंडांच्या आसपास पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात, असा आदेशही न्यायालयाने दिला. याचा अर्थ, रेड्डी सरकारच्या एकूण व्यवहाराबद्दल शेतकऱ्यांमध्ये असंतोष होता आणि त्याची दखल न्यायालयाला घ्यावी लागली.

**- शैलेश रेड्डी**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# बैलगाडी शर्यतींना परवानगी

## नियमांचे पालन न केल्यास कारवाई; जिल्हाधिकारी यांचा इशारा

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव कमी झालेला आहे, त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात बैलगाडी शर्यत भरविण्यास आयोजकांना परवानगी देण्यात आली आहे. त्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी काढले आहेत. मात्र नियमांचे पालन न केल्यास कारवाई करण्याची इशारा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील लम्पी चर्मरोगाचा आढावा घेतल्यानंतर नियंत्रित क्षेत्रात कोणताही प्राणी बाजार भरविणे आणि प्राण्यांच्या शर्यती लावण्यास परवानगी देण्याबाबतचे अधिकार राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ नुसार जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी यांना त्यांच्या उपविभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये बैलगाड्यांच्या शर्यतीस यापूर्वीच अधिकार प्रदान




केले आहेत. तरी शासन अधिसूचना मधील अटी व शर्थीच्या अधीन राहून सोलापूर जिल्ह्यातील बैलगाडी शर्यतीस परवानगी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या १६ डिसेंबर २०२१ रोजीच्या निर्णयानुसार घटनापिठाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून १० डिसेंबर २०१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या महाराष्ट्र क्रूरतेने वाघविण्यास प्रतिबंध करण्याबाबत नियम २०१७ मध्ये विहित

> **बैलगाडी शर्यत भरविण्याबाबत काढण्यात आलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधिता विरोधात आपत्ती व्यवस्थापन कायदा तरतुदी अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाईल.**
> **- (मिलिंद शंभरकर, जिल्हाधिकारी)**

करण्यात आलेल्या नियम व अटी तसेच महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रकामधील अटी व शर्थीचे पालन आयोजकांनी काटेकोरपणे करणे बंधनकारक राहील.शर्यतीतील सर्व बैलांच्या जोड्यांचे लम्पी चर्मरोग प्रतिबंधात्मक लसीकरण केल्याचे शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील, तसेच शासन परिपत्रकातील अटी व शर्थीनुसार नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील, ज्या गावांमध्ये बैलगाडी शर्यत घेण्यात येणार आहे. त्या गावातील सर्व गोवंशीय जनावरांचे लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीकरण १०० टक्के पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे. यांचा शासकीय पशुवैद्यकीय संस्थेचा दाखला पाहून बैलगाडी शर्यतीस परवानगी दिली जाणार आहे.



## तुळजापूर रोडवर स्वाभिमानीचे रस्ता रोको आंदोलन

**सोलापूर** : सूरत-चेन्नई महामार्ग व तांदूळवाडी ते केगांव बाह्यवळण रस्त्याचा शेतकऱ्यांच्या बाधित होणाऱ्या जमिनीला समृद्धी महामार्गाप्रमाणे पाच पट भाव द्यावा या मागणीसाठी स्वाभीमानी शेतकरी संघटनेच्यावतीने सोलापूर तुळजापुर रोडवर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. उळेगांव येथे झालेले आंदोलन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, जिल्हा उपाध्यक्ष पप्पू पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्न शासन दरबारी मांडण्याबरोबर त्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बुधवारी २२ फेब्रुवारी रोजी राज्यव्यापी चक्का जाम आंदोलनाची हाक दिली होती. त्यांच्या एक भाग म्हणून हे आंदोलन करण्यात आले.शेतकऱ्यांची विज कनेक्शन तोडणी त्वरीत थांबवावी, थकीत एफ आर पी अधिक व्याज शेतकऱ्यांच्या खात्यावर त्वरित जमा करावे, ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, रासायनिक खतांच्या भरमसाठ वाढलेल्या किंमती नियंत्रणात आणण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने अनुदान देऊन त्या किंमती नियंत्रणात आणाव्यात, ज्या शेतकऱ्यांनी पिक विम्याच्या तक्रारी नोंदविल्या आहेत, त्यांच्या खात्यावर पिक विमा त्वरित जमा करावा आणि कापूस व सोयाबीनला १२ हजार रुपये हमी भाव मिळावा यासह प्रमुख १० मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्यशासनाच्या विरोधात घोषणा बाजी करण्यात आली. यावेळी अमोल वेदपाठक, महेश भोज, गोविंद वेदपाठक, मनोज वेदपाठक, बिरु रामा मोटे, कृष्णात नवनाथ हेडे, परमेश्वर नागनाथ गाढवे, दिनेश रमेश शिंदे, प्रशांत बब्रुवान शिंदे, प्रमोद नागनाथ घोडके, विनायक घोडके, आण्णासाहेब डांगे, लक्ष्मण भानुदास शिंदे, सतीश आप्पाराव खंडागळे, सुनिल ज्ञानेश्वर चव्हाण, महेश सुरेश स्वामी, वाहेद काझी, प्रशांत मस्के आणि सादिक पठाण यांच्यासह शेतकरी-कष्टकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धामणगाव दुमाला येथे घरातून ५० हजारांची चोरी

**वैराग** : बार्शी तालुक्यातील धामणगाव दुमाला येथील किसान शामराव भोसले यांच्या घरात प्रवेश करून चोरट्याने रात्री २ च्या सुमारास घरातील कपाटीत असलेले रोख पन्नास हजार व गावातीलच शेजारी असणारे प्रवीण दामोदर शिंदे यांच्या घरातून पाच हजार किमतीचा मोबाईल चोरल्याची घटना धामणगाव (दु)ता. बार्शी येथे रात्री दोनच्या सुमारास घडली . तीन अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी किसन भोसले घरामध्ये दरवाजा बंद करून झोपले



असताना रात्री दोन च्या सुमारास फिर्यादीची सुन शुभांगी भोसले यांना जाग रात्री २ वाजता जाग आल्यानंतर पाहिले असता घरातून तीन इसम चोर पळून जात असताना दिसले त्यानंतर फिर्यादींनी मुलगा व सून यांना विचारले की, कपाटामध्ये ठेवलेले सोने व पैसे आहेत का? असे विचारले असता सुन शुभांगी यांनी कपाटात जाऊन पाहिले असता कपाटातील रोख रक्कम ५० हजार रुपये चोरून नेल्याची खात्री झाली. त्यानंतर गावातील पोलीस पाटील गणेश मासाळ घटनास्थळी आले, त्यानंतर अज्ञात तीन चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुळेगाव तांडा येथे दुचाकी अपघात; जखमीचा मृत्यू



सुराज्य/सोलापूर

मुळेगाव तांडा (ता.दक्षिण सोलापूर) येथे दुचाकी घसरून गंभीर जखमी झालेले शिवाजी गाजू राठोड (वय ६५) हे शासकिय रुग्णालयात उपचार घेताना गुरुवारी रात्री मयत झाले. सोमवारी सायंकाळच्या सुमारास ते दुचाकीवरून घराकडे निघाले होते.गावाजवळ दुचाकी घसरल्याने ते जखमी झाले होते. त्यांना कासु पवार (जावई) यांनी रुग्णालयात दाखल केले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जनजागृती मेळावा

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर यांच्यामार्फत जिल्हास्तरीय पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम जनजागृती मेळावा गुरुवार दि.२३ फेब्रुवारी २०२३ रोजी नातेपुते शहरात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला माळशिरस तालुक्यातील व शेजारी तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात महिलांचा तसेच युवक वर्ग सहभाग हे या लक्षवेदी ठरले. या कार्यक्रमासाठी नातेपुते नगरपंचायत नातेपुते यांचे विशेष सहकार्य मिळाले. माळशिरस तालुक्यातील सोलापूर जिल्हाचे शेवटचे शहर नातेपुते जे सोलापूर पासून १५० किलोमीटर अंतरावर असून जिल्हा शासकीय कार्यालय शासकीय योजनापासून दूर राहतात यांना योजनेची माहिती होण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ जिल्हा कार्यालय सोलापूर यांच्यामार्फत पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम जनजागृती मेळावा संपन्न झाला.या मेळाव्यात बँक,यशस्वी उद्योजक तसेच मंडळाचे



अधिकारी यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेविषयी नागरिकांना सविस्तर माहिती तसेच नागरिकांच्या अडचणी याबाबत नागरिकांना मार्गदर्शनही केले. बँकेचे प्रतिनिधी अक्षय भगत, व्यवस्थापक, विदर्भ कोकण बँक नातेपुते, श्री रवींद्र प्रसाद बँक ऑफ इंडिया नातेपुते यांनी मार्गदर्शन केले. यशदा चे प्रसिध्द व्याख्याते नंदकुमार दुपटे सर यांनी नवीन उद्योजनक यांना नागरिकांना हसवत प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. या जनजागृती कार्यक्रमाचे अध्यक्षा नातेपुते नगरपंचायत नगराध्यक्षा सौ. उत्कर्षाराणी पलंगे, प्रमुख पाहुणे डॉ.नरेंद्र कवितके, नातेपुते पोलीस स्टेशचे सहा.पोलीस निरिक्षक संपागे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बनसोडे साहेब, ज्येष्ठ सहाय्यक सज्जन कांबळे, सचिव माळशिरस दीपक शेळके, चेअरमन दत्ता सावंत, सुपरवायझर आर.ए.शेख, मधुक्षेत्रीक पलवेंचा, केंद्रप्रमुख विजयकुमार खडके, महिला बचत गट अधिकारी रणजीत शेंडे, भगवान धनंजय, नाईक नवरे मोहोळचे यशस्वी उद्योजक विष्णू थेटे, यशस्वी उद्योजक रासकर तसेच कार्यक्रमाचे नियोजन सामाजिक कार्यकर्ते विनायक सावंत, बिपीन सातपुते, नेहरु युवा मंडळाचे गणेश घुले उपस्थित होते.

## पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्त करणार : कारंजे

**सोलापूर** : गॅसलाईन, जिओ केबल आणि आता सीसीटीव्ही कॅमेऱ्यासाठी शहरात ठिकठिकाणी रस्त्यांची खोदाई मोठ्या प्रमाणात सुरू आहे. परंतु खोदाई झाल्यानंतर रस्ते त्वरित दुरुस्ती झाले पाहिजे, यासाठी भरपाई रकमेतून टेंडर काढून पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्त करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली.

जुळे सोलापूर परिसरासह इतर हद्दवाढ भाग गेल्या २० वर्षांपासून असुविधांच्या विळख्यात होते. गेल्या चार-पाच वर्षात ड्रेनेज, दिवाबत्ती, रस्ते या सुविधा देण्याला गती आली होती. मात्र लागलीच गॅसलाईन, अंतर्गत जिओ केबल घालणे आणि शहरात सीसीटीव्ही बसविण्यासाठी टाकण्यात येणाऱ्या केबलसाठी नव्याने बनविण्यात आलेल्या रस्त्यांची खोदाई सुरू झाली. याबाबत पदाधिकारी, नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रार दिली. जेसीबीने खोदाई झाल्याने अनेकांची नळजोड तुटले तर कुठे पाण्याची लाईन फुटणे आदी प्रकार होत आहेत.

ही कामे त्यानंतर झाली नसल्याच्याही तक्रारी आल्या. दिवसेंदिवस खोदकामाच्या वाढत्या तक्रारींवर नियंत्रण आणून रस्ते त्वरित दुरुस्त करण्यासाठी प्रशासन आता निविदा काढणार आहे. खोदाईमुळे रस्ते दुरुस्तीपोटी संबंधित कंपनीकडून घेतलेल्या भरपाई रकमेची निविदा काढून काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्यापोटी आतापर्यंत महापालिकेने संबंधित कंपनीकडून भरून घेतलेल्या १६ कोटी रुपयांची निविदा काढून पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते दुरुस्ती पूर्ण होईल.



## माजी आमदार रमेश कदम यास न्यायालयीन कोठडीत रवानगी

सुराज्य/सोलापूर

आण्णाभाऊ साठे महामंडळात आर्थिक अपहार प्रकरणी पोलिस कोठडीत असलेल्या माजी आमदार रमेश कदम यास न्यायालयीन कोठडीत पाठविण्याचा आदेश विशेष न्यायाधीश आर. एन.पांढरे यांनी शुक्रवारी दिला. रमेश कदम यांनी त्यांची आजी बायम्मा गणपत शिरसागर (रा. नांदनी ता. बार्शी) यांच्या नावाने दुग्ध व्यवसायाचे कर्ज मंजुरीचे आदेश तयार करून कर्ज मंजूर केले.

खोटे प्रकरण खरे भासवून सदरचे आदेश महामंडळाचे कर्मचारी लक्ष्मण कांबळे व इतरांवर दबाव टाकला. आणि ४ लाख ७५ हजाराचा धनादेश देऊन महामंडळ व सरकारची फसवणूक केली. अशा आशयाची फिर्याद अनिल रागोबा म्हस्के यांनी ३१ मे २०१७ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिली होती. या प्रकरणात पोलिसांनी माजी आमदार रमेश कदम यास अटक करून पोलीस कोठडी घेतली होती. कोठडीची मुदत संपल्याने त्यास आज न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड मिलिंद थोबडे, ॲड.विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे ॲड. अल्पना कुलकर्णी यांनी काम पाहिले.






# कास्ट्राईब कर्मचारी महासंघातर्फे एकदिवसीय धरणे आंदोलन

✔ सुराज्य/सोलापूर

राज्यातील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदोन्नती देण्यात यावी व २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ जिल्हा शाखा सोलापूरच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन लोकशाही की पेशवाई? असा जाब विचारत शासनाच्या विरोधात कृष्णा इंगळे यांच्या आदेशानूसार व मार्गदर्शनाखाली एक दिवसाचे धरणे आंदोलन जिल्हाध्यक्ष मनिष सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. पदोन्नतीबाबत सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीयांची पदोन्नती रोखता येणार नाही असे स्पष्ट निर्देश २०१८ ला राज्य शासनाला देऊनही महाराष्ट्र शासनाने अद्यापही पदोन्नती बाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. तसेच मागासवर्गीयांच्या अनुशेष जवळपास ३ लाख ४० हजार एवढया मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत आणि पदोन्नती मधील आरक्षण १ लाख १५ हजार पदांना पदोन्नती देण्यात यावी; जुनी पेन्शन योजना इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातही तात्काळ लागू करावी या मागणीसह परिचर, वाहन चालक व विविध कंत्राटी पदांची भरती न करता पूर्वीप्रमाणे बिंदूनामावलीचा अवलंब करून शासनाने नियमित नोकर भरती करावी या व इतर मागण्यांसाठी कास्ट्राईबच्या वतीने ✻लोकशाही की पेशवाई?✻ या मथळ्याखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोठ्या संख्येने आणि जोशपूर्ण वातावरणात आंदोलन केले. याबाबतचे निवेदन तहसिलदार श्रीमती प्रीती



डोले यांना देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ, सोलापूर जिल्हाध्यक्ष राजेश देशापांडे; आणि लिपिकवर्गीय संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश गोडसे; महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद युनियन, राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज आणि शासकीय निमशासकीय कृती समितीचे समन्वयक अशोक इंदापूरे; तसेच जिल्हा परिषद प्रशासनाधिकारी अनिल जगताप, सचिन साळुंखे, प्रताप रूपनर, सचिन घोडके, चंद्रकांत होळकर; तसेच सोलापूर जिल्हा मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे प्रा.विभाग प्रमुख दिनेश क्षिरसागर; तसेच आरक्षण कृती समितीचे समन्वयक राजाभाऊ सोनकांबळे आणि आयटीआय संघटनेचे विजय भांगे, अरविंद चौधारी यांनी आंदोलनास पाठिंबा जाहीर केला. तसेच उमाकांत राजगुरू, भगवान चव्हाण, नरसिंहा गायकवाड, नागसेन कांबळे, श्रीमती राजश्री कांगरे, श्रीमती मोरे, माढेकर, तसेच शिक्षक संघटनेचे सोमलिंग कोळी, सादीक तांबोळी, अंबरीश गोसावी आदिसह जिल्हा परिषदेचे शिक्षक आणि कर्मचारी आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याचबरोबर कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे जिल्हा सचिव अरविंद जेटींथोर, कार्याध्यक्ष कल्याण श्रावस्ती, संघटक सचिव लक्ष्मण गायकवाड, रेळेकर, कोषाध्यक्ष एस.ए.लोहार, तसेच खातेनिहाय शाखेच्या जिल्हा परिषदेचे जिल्हाध्यक्ष अरूणभाऊ क्षिरसागर, जिल्हा परिषद शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल कोरे, महसूल शाखेचे विजय माने, सिव्हिल शाखेचे अध्यक्ष सचिन सोनवणे, कोषागार शाखेचे अध्यक्ष कुलदीप सोनवणे, पाटबंधारे शाखेचे अध्यक्ष शरण अहिवळे, आरटीओ शाखेचे अध्यक्ष विकास रणदिवे आणि इतर पदाधिकारी- सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोर्टी येथे दुचाकी अडवून महिलेच्या पर्समधील रोकड लुटली

✔ सुराज्य/पंढरपूर

दुचाकीवरून घराकडे जात असताना एका विवाहित महिलेला वाटेत अडवून तिच्या पर्समधील २ हजार रुपये लुटून नेल्याची घटना कोर्टी (ता. पंढरपूर) येथे बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी एका विरुद्ध जबरी चोरींचा गुन्हा दाखल केला आहे.



अंजुम अफजल शेख (रा.कोर्टी) या आपल्या स्कुटी वरून घराकडे निघाल्या होत्या. त्यांच्या परिचयातील अब्दुल उर्फ बाळू अहमद मुलानी(रा.कोर्टी)याने त्यांची दुचाकि अडवली. आणि त्यांच्या पर्समधील २ हजार रुपये लुटून पसार झाला. अशी नोंद पोलिसात झाली. फौजदार गोदे पुढील तपास करीत आहेत.

## कचरा जाळताना महिलेचा भाजून मृत्यू

✔ **सोलापूर** : शेतातील कचरा जाळत असताना साडीला आग लावून भाजल्याने ८० वर्षीय वृद्ध महिला भाजून मयत झाली. ही घटना सनमडी (ता. जत जि.सांगली) येथे घडली. हुवक्का मेसप्पा कांबळे (वय ८० रा. सनमडी) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या २१ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास आपल्या शेतात कचरा गोळा करून पेटविला होता. त्यावेळी साडीला आग लागल्याने त्या भाजून गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना शोभा सर्जे (मुलगी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्या शुक्रवारी पहाटे मयत झाल्या. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकित झाली आहे.

## सुट्टीच्या दिवशी वीजबिल भरणा केंद्र चालू राहणार

थकबाकी न भरल्यास कारवाई अटळ

✔ सुराज्य/सोलापूर

वीज ग्राहकांना वेळेत चालू वीजबिल व थकबाकी भरणे सोईचे व्हावे सोलापूर शहर जिल्हासह पुणे, कोल्हापूर, सांगली येथिल महावितरणचे वीजबिल भरणा केंद्र मार्च अखेर शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी चालू ठेवली जाणार आहेत. त्यामुळे थकबाकी भरावी अन्याथा कारवाई करण्याचा इशारा महावितणच्या वतीने दिला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात महावितरणची थकबाकी वाढलेली आहे. थकबाकी वसूल करण्याची मोहीम सुरु आहे. थकबाकीदार ग्राहकांचा थकबाकीपोटी वीज खंडित करण्यात येत आहे. चालू वीजबिल व थकबाकी भरणे सोईचे व्हावे म्हणून साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वीजबिल भरणा केंद्रे चालू असणार आहे. थकबाकीदार सर्व वीजग्राहकांनी थकबाकी व चालू



वीजबिलांचा भरणा करून सहकार्य करावे,तसेच लघुदाब वर्गवारीतील सर्व वीजग्राहकांना घरबसल्या बिलांचा भरणा करण्यासाठी मोबाईल अँपद्वारे ऑनलाईन' सोय उपलब्ध आहे.

तर लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक, वाणिज्यिक व घरगुती ग्राहकांचे वीजबिल 'आरटीजीएस' किंवा 'एनईएफटी' द्वारे थेट भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणच्या वतीने केले आहे.


## समाजसुधारकांचा वैचारिक वारसा जतन करा : डॉ.मेटकरी

### लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

✔ सुराज्य/सोलापूर

विविधतेने समृद्ध असलेल्या आपल्या देशाचा एकसंघपणा अबाधित ठेवण्यात समाज सुधारकांनी केलेले प्रबोधन महत्त्वाचे होते. मात्र आज जात, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश यांच्या अस्मितांच्या संघर्षातून होणारे समाजाचे ध्रुवीकरण टाळण्यासाठी समाज सुधारकांच्या वैचारिक वारसा पुढे चालविला गेला पाहिजे असे प्रतिपादन पु.अ.होळकर सोलापूर विद्यापीठाचे उप कुलसचिव डॉ. उमराव मेटकरी यांनी केले.

साात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला



महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित भारतातील समाज सुधारकांचे विचार या विषयावरील ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे होते. या चर्चासत्रात हावडा (पश्चिम बंगाल) येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इजिनिअरिंग सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डॉ. सुभाशिष बंडोपाध्याय, हैद्राबाद केंद्रीय विद्यापीठातील डॉ. अनुरेखा चारी-वाघ यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे म्हणाले की, समाज सुधारकांनी विषमता निर्माण करणाऱ्या चुकीच्या प्रथा, परंपरा नष्ट करून भारतीय समाजात आधुनिक मूल्यांची पेरणी केली. त्यांच्या योगदानामुळेच भारतातील वंचित आणि दुर्बल घटकांना मानवतेचे हक्क आणि अधिकार मिळाले. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नागोराव भुरके यांनी केले. आभार उपप्राचार्य देवराव मुंडे यांनी मानले. तर सूत्रसंचलन डॉ. इंदुमती चोळळे आणि प्रा. अरूणा कोडम यांनी केले.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**
**ई-निविदा सूचना क्रमांक.३० सन २०२२-२०२३ (ऑनलाईन)**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर हे शासन निर्णय क्रं.सीएटी-०१/२०१५/प्र.क्रं.-२०/इमारती-२, मंत्रालय मुंबई. दि.२४/०४/२०१५ व शासन शुद्धीपत्रक दिनांक.२९/६/२०१७ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील यांचेकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील येळेगाव गावडेवाडी वांगी मंद्रुप रस्ता प्रजिमा क्र.२०० कि.मी.८/०० ते १५/०० मध्ये सुधारणा करणे. | रू.३०४.२५ लक्ष |
| २ | सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील सोलापूर होटगी औज इंगळगी जेऊर रस्ता राज्य मार्ग क्र.३९६ कि.मी. ३/०० ते ६/४०० व १२/००० ते १७/०० मध्ये सुधारणा करणे. | रू.२९९.९८ लक्ष |
| ३ | सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील रा म मा ४६५ (रा.मा.२०२) येळेगांव गावडेवाडी वांगी मंद्रुप ते रा.म.मा. (जुना १३) नांदणी रस्ता प्रजिमा क्र.२०० कि.मी. ४/००० ते ८/००० मध्ये सुधारणा करणे. | रू.३२८.७८ लक्ष |
| ४ | सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील सादेपूर निम्बर्गी कंदलगाव गावडेवाडी मनगोळी रस्ता प्रजिमा क्र.४१ किमी १५/०० ते २२/०० मध्ये सुधारणा करणे. | रू.३७८.४९ लक्ष |

टिप :- सदर निविदेबाबतची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर दि.२७/०२/२०२३ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.
१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर

DGIPR-C6317

**महाराष्ट्र शासन**
**सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे**
**संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक-२२ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे दूरध्वनी क्र.०२२-२५४१००४६ हे ई-निविदाद्वारे (ऑनलाईन) खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील आदिवासी विकास विभागाकडील नोंदणीकृत वर्ग ४-अ व त्यावरील कंत्राटदार यांचेकडून मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (अ+ब) (रू.लक्ष) | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | सवतगव्हाण ता.माळशिरस जि.सोलापूर येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळा संकुलात संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे. | रू.५७,७२,८४९ | वर्ग ४-अ व त्यावरील |

- निविदा डाऊनलोड करण्याचा दि.२७/०२/२०२३ ते दि.०६/०३/२०२३
- ई-निविदा तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दि.०८/०३/२०२३
- सर्व पात्र/ इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवर enrolled करणे आवश्यक आहे.

जा.क्र.साबां(आ)विठा/ठाणे/निविदा/क्रं.२२/४४३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे
सा.बां.आवार, स्टेशनरोड, ठाणे-४००६०१
ईमेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२५४१००४६
दि.१७/०२/२०२३

सही/-
कार्यकारी अभियंता
सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे

विमाका-पुणे-जाहि-२७२-२०२२-२३

**भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ११(१) अनुसार अधिसुचना**

क्र.भूसं/एस आर १६/२०२२ उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, मंगळवेढा, दि.२३/११/२०२२

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसुचना क्र. एम आय एस-११/२०१४/सी.आर-७७/ए-२, दि.११/०९/२०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापर करून असे अधिसुचित करण्यात आले आहे की, सदर अधिनियमाच्या कलम ३(झ, अ) अन्वये सार्वजनिक जमीनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादनासंबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

ज्याअर्थी, सदर अधिसुचनेन्वये जिल्हाधिकारी सोलापूर, हे समुचित शासन आहेत. त्याअर्थी परिशिष्ट-१ मध्ये नमुद जमीन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासु शकते. तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट -२ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी सदर कायद्याचे कलम ११ उप कलम (१) अन्वये अधिसुचित करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमीन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट - ३ मधील भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमीन संपादनाची माहिती विनिर्दीष्ट करण्यात आली आहे. आणि त्याअर्थी परिशिष्ट-४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी परिशिष्ट-५, मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशील देण्यात आला आहे.

त्याअर्थी सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम (४) अन्वये असे जाहीर करण्यात येते की, सदर अधिसुचना जाहीर झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पुर्ण होईल अशा कालावधी पर्यंत कोणतीही व्यक्ती प्राथमिक अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमीनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतरण करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या संबंधित जमीनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अंमल बजावणीतून अशा जमीनीच्या मालकास सुट देवू शकेल. परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे त्या व्यक्तीला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतिची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही. सदर कायद्याच्या कलम ११ चे उप कलम ५ व भुमी संपादन पुनर्वसन करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे कलम १० उप कलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करेल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी सोलापूर हे समुचित शासन असल्याने उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग, मंगळवेढा यांना जिल्हाधिकारी यांची कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत केले आहे.

**परिशिष्ट - १**
**जमिनीचे वर्णन**
**टेंभू उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत सांगोला मुख्य कालवा कि.मी.२२ ते २७**
**मौजे गुणप्पावाडी, ता.सांगोला क्र.भूसंपादन/एसआर....../२०२२**

| गावाचे नाव | तालुका | गट नंबर | संपादन क्षेत्र हे.आर | इतर बाबी |
|---|---|---|---|---|
| गुणप्पावाडी | सांगोला | ४४ | १.१८ | निरंक |
| | | ४३ | ०.८३ | निरंक |
| | | ३५ | ०.२८ | निरंक |
| | | ९२/१ व ९२/२ | ०.५२ | निरंक |
| | | ९७ | ०.०४ | निरंक |
| | | १० | ०.२० | निरंक |
| | | ५ | ०.२९ | निरंक |
| **एकूण** | | **७** | **३.३४** | - |

**परिशिष्ट - २**

| | |
|---|---|
| प्रकल्पाचे नाव | टेंभू उपसा सिचन प्रकल्पांतर्गत सांगोला मुख्य कालवा कि.मी.२२ ते २७ मौजे गुणप्पावाडी, ता.सांगोला |
| प्रकल्पाचे विवरण | टेंभू उपसा सिचन प्रकल्पांतर्गत सांगोला मुख्य कालवा कि.मी.२२ ते २७ मौजे गुणप्पावाडी, ता.सांगोला |
| सामाजिक फायदे | जलसिंचन (सामाजिक, आर्थिक व इतर फायदे) |

**परिशिष्ट - ३**
**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारे कारण :-**
बाधीत सर्व जमीन धारक विस्थापित होत नाहीत. त्यामुळे विस्थापन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**परिशिष्ट - ४**
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**
भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १०(ख) अन्वये महाराष्ट्र शासन व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसुचना दि.१३ मार्च २०१५ अनुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सुट देण्यात आली आहे.

**परिशिष्ट - ५**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशासकाचे पदनाम | उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग मंगळवेढा |
| २ | प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता | मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर |
| ३ | ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्याचा तपशील | मा.जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील आदेश क्र.२०२२/भूसं/कार्या/आरआर-४५१४ दि.२९-०९-२०२२ |

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमीनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. अशा जमीनीच्या संयुक्त मोजणी नकाशाची प्रत प्रशासकाचे कार्यालयात निरिक्षणार्थ उपलब्ध आहे. बाधीत जमीन धारक यांना प्रारंभीक अधिसुचनेचा प्रसिध्दीच्या तारखेपासुन ६० दिवसाच्या आत उप विभागीय अधिकारी, मंगळवेढा विभाग मंगळवेढा यांच्या कार्यालयात लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविता येईल.

**स्थळ : मंगळवेढा**
**दिनांक : २३/११/२०२२**

शिक्का

**सही/-**
**अप्पासाहेब समिंदर**
**उपविभागीय अधिकारी**
**मंगळवेढा विभाग मंगळवेढा**

**जिमाका/सो/जाहि/२७८/२२-२३**



## कामगार व ऊसतोड मजुरांसाठी आवताडे शुगर येथे आरोग्य शिबिर

**मंगळवेढा** : तालुक्यातील आवताडे शुगर अँड डिस्टिलरीज प्रा. लि. नंदूर व प्राथमिक आरोग्य केंद्र, मरवडे यांच्या संयुक्त विद्यमाने कारखाना कार्यस्थळावर कामगार व ऊसतोड मजुरांचे आरोग्य तपासणी शिबीरा मध्ये ३५२ जणांची तपासणी करण्यात आली. डॉ विलास तोंडे पाटील, डॉ अरुण कुमार यांनी इ.सी. जी, रक्तदाब, मधुमेह आधी आरोग्य विषयक समस्यांची तपासणी करून उपचारपर मार्गदर्शन केले.पंढरपूर -मंगळवेढचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली व कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांच्या संकल्पनेतून हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये कारखाना कामगार व ऊसतोड मजूर यांची शारीरिक आरोग्य तपासणी करून नामवंत डॉक्टरांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शनपर मनोगत प्रमोदकुमार म्हमाणे यांनी मांडले.या शिबिरासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम डॉ. भिमराव पडवळे, एच आर मॅनेजर डी. बळवंतराव, वर्क्स मॅनेजर दिलीप जाधव, चिफ केमिस्ट मोहन पवार, डिस्टलरीज मॅनेजर संभाजी फाळके, फायनान्स मॅनेंजर रघुनाथ उन्हाळे, शेती अधिकारी रमेश पवार व संपत आटकळे, वसंत लेंडवे, आय टी मॅनेंजर मिनाज शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, सुरक्षाअधिकारी चंद्रकांत राठोड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.गौरीशंकर बुगडे, सिध्दराया बिराजदार, आनंद हत्तरसंघ, आरोग्य सहाय्यक नागनाथ लंगोटे, औषध निर्माण अधिकारी हनुमंत कलादगी, प्रवीण पवार, चंद्रकांत पवार शहजान मुलाणी, विद्याराणी स्वामी, मोहन सरडे, आशा वर्कर व अंगणवाडी सेविका आदी मान्यवर व आरोग्य विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## तबला अलंकार परीक्षेत श्रीया कुलकर्णी प्रथम

**सांगोला** : अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई यांचे मार्फत जानेवारी महिन्यात घेण्यात आलेल्या तबला अलंकार परीक्षेत सांगोला येथील श्रीया श्रीगणेश (नितीन) कुलकर्णी हिने प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होऊन कोल्हापूर केंद्रात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे.



तालमणी पंडित मनमोहन कुंभारे सर यांच्या रिदम अकॅडमी सांगली येथे गेल्या आठ वर्षापासून श्रिया कुलकर्णी तबल्याचे शिक्षण घेत आहे. इयत्ता चौथी पासूनच तबल्याची तिला आवड असल्याने तिने तबल्यातील उच्च शिक्षण घेण्याचा निश्चय करून अलंकार च्या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे तिला अलंकार ही पदवी प्राप्त झाली आहे. अलंकार ही पदवी तबल्यातील पोस्ट ग्रॅज्युएशनची पदवी आहे. श्रिया कुलकर्णी ही एम. एस्सी. (प्रथम श्रेणी) असून सध्या शिवाजी पॉलीटेक्निक मध्ये गणित विषयाचे अध्यापन करत आहे. तिच्या या उत्तुंग यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



## अन्नछत्र मंडळाच्यावतीने प्रसादरुपी आशिर्वाद : सोनवणे

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाच्यावतीने प्रसादरुपी आशिर्वाद आम्हा कलाकारांना मिळत असल्याने आमची यशस्वी घोडदौड सुरु असल्याचे मनोगत बबन, ख्वाडा व आता आगामी रौंदळ या मराठी चित्रपटात मुख्य भूमिका असलेले अभिनेती नेहा सोनवणे, नाशिक यांनी व्यक्त केले. ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आल्या असता मंडळाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. त्यांच्यामसवेत दिग्दर्शक गजानन पडोळ (जालना), भाऊसाहेब शिंदे (हिंगणी दु), धिरज गायकवाड, विशाल नागटिळक, अजय पांदिरकर, रोहन नंदाने, महादेव चिंचोळकर, देवा चिंचोळकर आदी उपस्थित होते. यावेळी मंडळाचे सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, बाळासाहेब घाडगे, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, कल्याण देशमुख, शावरेप्पा माणकोजी, समर्थ घाटगे, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## पंधरा हजारांची इलेक्ट्रिक मोटर पळवली

**सोलापूर** : १५ हजार किमतीची एचपी कंपनीची हायपावर पाणबुडी पाण्याची इलेक्ट्रिक मोटर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना वेरना हॉटेल विजापूर रोड येथे दि.२० ते २१ फेब्रुवारी दरम्यान घडली.याप्रकरणी सिलीसिद्ध शिवकरणी बळुरे (वय-३१, रा.हत्तुर गाव तालुका दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक बर्डे हे करीत आहेत.

# महापुरुषांना जातीपातीच्या बंधनातून मुक्त करावे : प्रा.बनबरे

सुराज्य/टेंभूर्णी

**जोपर्यंत मराठा, बहुजन, कुणबी समाजामध्ये महिलांचा सन्मान होणार नाही.सर्व क्षेत्रात महिलांना आपण पुढे आणणार नाही तोपर्यंत आपण लढाई जिंकणार नाही.तसेच सर्व महापुरुषांना जातीपातीच्या बंधनातून मुक्त करणार नाही.तोपर्यंत त्यांची प्रेरणा सर्व भारतीय समाजाला मिळणार नाही असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे प्रदेश प्रवक्ते तथा प्रख्यात व्याख्याते प्रा.गंगाधर बनबरे यांनी केले.**



टेंभुर्णी येथील शिवछत्रपती मध्यवर्ती शिवजन्मोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात व्याख्याते प्रा.गंगाधर बनबरे हे 'शिवराय व आजचा तरुण' या विषयावर बोलत होते. पुढे बोलताना प्रा.बनबरे यांनी व्यवस्थेवर सडेतोड शब्दात आसूड ओढले.ते म्हणाले की,भारतात भगवान बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज,संत तुकाराम महाराज जन्माला आले.जगातील अर्ध्या देशात बुद्धाच्या तत्वज्ञानाचा प्रभाव आहे.सर्व जगाने बुद्धाला स्वीकारले आहे.आपण कधी स्वीकारणार आहोत? असा प्रश्न उपस्थित केला.आपण शिवसूत्र जोपर्यंत अंगीकारणार नाहीत,तोपर्यंत आजची लढाई सोपी जाणार नाही. शिवाजी महाराज देव नव्हते ते माणूस होते. ते शहाजीराजे व आई जिजाऊ यांच्या पोटी जन्माला आले.स्वकर्तुत्वाने मोठे झाले. आज आमच्या तरुण-तरुणीने त्यांची प्रेरणा घेऊन लढाई जिंकावयास हवी होती. कॉम्रेड पानसरे कम्युनिस्ट होते. पण त्यांना प्रबोधनासाठी शिवचरित्र लिहावे लागले हीच शिवचरित्राची ताकद आहे.बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा गांधी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही भारताची ओळख आहे. हजारो पिढ्या जिवंत ठेवण्यासाठी शिवचरित्र पुरेसे आहे.या देशात शिवाजीचा मराठा म्हणावा असा कोण शक्तिशाली पुरुष आहे? तुमचे कल्याण करण्यासाठी कोण जन्माला आला आहे?तुम्हाला स्वतःलाच बदलावे लागेल.आंबेडकर,फुले यांचे विचार आत्मसात करावे लागतील. तरच तुमचे कल्याण होईल.खरच इमानदारीने तुम्हाला बदलायचे असेलतर आजची लढाई कोणती आहे हे शिवछत्रपतींच्या वर्तमानातून आपणास शोधता आले पाहिजे.एक शिवाजी म्हटल्याबरोबर तेहतीस कोटी देवाची फलटण बाद होते.हीच शिवचरित्राची ताकद आहे.

इंटरनेट नव्हते, रस्ते नव्हते, भाषा भिन्न होत्या.अशा स्थितीत स्फुल्लिंग पेटवून संपूर्ण भारतभर राज्य वाढविले हा महाराजांचा किती मोठा प्रताप आहे?.टीका टिप्पणी जाणीवपूर्वक आपल्याच महापुरुषांना टार्गेट करून केली जाते.त्यांची पुन्हा-पुन्हा विटंबना करण्यात येते.हे षडयंत्र आहे.शिवाजी महाराजांच्या प्रशासनाची बरोबरी ब्रिटिशच काय जगातील कोणत्याही देशाचे प्रशासन करू शकत नाही.पेशव्यांनी शिवछत्रपतींची कागदपत्रे नष्ट केली. तुकाराम महाराजांच्या अभंगावर व शिवजयंतीवर बंदी घातली.यामुळे समाज अनागोंदीत गेला.समाजाला बदलायचे असेल तर शिवचरित्राशिवाय पर्याय नाही हे ओळखून ज्योतिबा फुले यांनी रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व पहिली शिवजयंती १८६९ साली साजरी केली.कुळवाडी भूषण नावाचा पोवाडा महाराजांवर त्यांनी लिहिला.

**आदानी अंबानी यांना देशातील सगळी हवा विकली आहे.देशातील पाच उद्योगपतींकडे निम्मी संपत्ती आहे.महाराज असते तर आदानी,अंबानी यांना त्यांनी ठेवले असते का?असा प्रश्न तरी उपस्थित केला.तुम्ही बदला नाहीतर तुम्हाला कडेलोटा पासून कोणीही वाचू शकणार नाही.सत्तेचा विचार जगातील संघर्ष आहे.सत्तेचा विचार फॅसीजम आहे.कोणते सुप्रीम कोर्ट देशात अस्तित्वात आहे.ते तुमचे नाहीच. हे सनातन्यांचे सरकार म्हणता मग पुरोगामी सरकार असताना सत्ता लोकहितासाठी का वापरली गेली नाही?**



## ग्रामीण भागातील पक्के रस्ते होण्याकरिता सरकार कटिबद्द : आ.कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील पक्के रस्ते होण्याकरिता सरकार कटीबद्ध असून आणखीन निधी उपलब्ध करुन दिला जाईल, त्याप्रमाणे कामाच्या गुणवत्तेला देखील प्राधान्य दिले जात आहे. नागरिकांच्या मुलभूत गरजा पुरविण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

ते गुरुवारी तीर्थ ते चपळगाव, बादोला (बु) ते बोरगाव दे., उडगी ते कल्लप्पावाडी या सुमारे ४ कोटी रस्ता कामाचे भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी आमदार कल्याणशेट्टी हे बोलत होते.

पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, गेल्या अनेक वर्षापासून विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण रस्त्यांची दयनीय अवस्था होती. मात्र आमदार झाल्यापासून ग्रामीण रस्त्यांकरिता प्राधान्य दिल्याने आज दळणवळण सुखकर होत असून राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून आगामी काळात मतदारसंघाकरिता विकासाच्या भरीव योजना आणण्यात येईल असे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले. यावेळी चपळगाव - सोसायटीचे अध्यक्ष आप्पासाहेब पाटील, संजय गांधी निराधार समितीचे ता.अध्यक्ष महिबूब मुल्ला, बसवराज बाणेगाव, पंडित पाटील, मल्लिकार्जुन कारले, महादेव वाले, सुरेश सुरवसे, बादोले - आप्पासाहेब बिराजदार, राजेंद्र बंदीछोडे, शंशीकांत पाटील, माणिक धायगोडे, सिध्दाराम बिराजदार, विठ्ठल कत्ते, धनराज बिराजदार, सुधाकर वाकडे, मौलाली शेख, बसवराज शेळके, सुनिल सावंत, प्रकाश पोमाजी, रवी राठोड, इरय्या स्वामी, श्रीकांत जिरगे, भागेश जिरगे, साहेबलाल भाईजान, हैदर शेख, दत्तात्रय चिंनगुडे, रमेश कत्ते, सोमनाथ विभुते, मन्सूर भाईजान, उडगी, रिपाइं ता.अध्यक्ष अविनाश मडीखांबे, दिलीप यमगर, काशिनाथ प्रचंडे, ओंकरप्पा हारकुड, वहीदपाशा शेख, धोंडप्पा बनसोडे, उमेश पांढरे, रमेश सोलंकर, सार्व.बांधकाम उपविभागाचे उपअभियंता अमोल खमितकर, ठेकेदार संजय इंगळे आदीसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्लास्टिक जप्ती मोहिमेसाठी टास्क फोर्स

सुराज्य/सांगोला

सांगोला नगरपरिषद आरोग्य विभागामार्फत शहरामध्ये प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती मोहीम राबविण्यात येत असून याकरता टास्क फोर्स ची नियुक्ती करण्यात आलेली आहे. शहरामध्ये शासनाने प्रतिबंधित केलेले थर्माकोल, सिंगल युज प्लास्टिक, प्लास्टिक कॅरीबॅगज याचा वापर व्यापारी नागरिक यांनी करू नये. जे नागरिक, व्यापारी प्रतिबंधित प्लास्टिक, थर्माकोल यांचा वापर करतील अशा नागरिकांवर, व्यापाऱ्यावर शासनाने ठरवून दिलेली कारवाई करण्यात येईल.




सध्या शहरांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिक जप्ती मोहीम, शहरांमध्ये घंटागाडीत कचरा न टाकता इतर कचरा टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्या वर नगर परिषदेमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. प्लास्टिक बंदी अंतर्गत शहरातील ८९ दुकानांची तपासणी करण्यात आली त्यामधील दोन दुकानावर कारवाई करण्यात आली असून रक्कम रुपये ७४००/- दंडा करण्यात आलेला आहे. सदर मोहिमे अंतर्गत आत्तापर्यंत दीडशे किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. या टीममध्ये गणेश गळीयल, निलेश कांबळे, अनिकेत चंदनशिवे, आशिष बनसोडे, प्रफुल्ल धनवडे, स्वच्छता निरीक्षक विनोद सर्वगोड हे कर्मचारी आहेत.

नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी डॉक्टर सुधीर गवळी यांनी नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी प्रतिबंधित प्लास्टिक थर्माकोल याचा वापर करू नये, तसेच शहर प्लास्टिक मुक्त ठेवावे असे आवाहन केलेले आहे.

## अक्कलकोट न.प.तर्फे स्वच्छता मोहीम

**अक्कलकोट** : अक्कलकोट नगरपरिषदेच्या वतीने संत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधुन शहरातील विविध भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच नागरीकांमध्ये कचरा मुक्त शहर, प्लास्टिक बंदी बाबत जागरूकता करण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी सचिन पाटील कार्यालयीन निरिक्षक मलिक बागवान, आरोग्य निरीक्षक नईम बागवान, शहर समन्वयक शुभम माने, कॅशियर प्रकाश लिगाडे, मुकादम सुभाष सोनकांबळे, बालाजी पारखे व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

## गळफास घेवून वृद्धाची आत्महत्या

**मंगळवेढा** : मंगळवेढा शहरातील लक्ष्मण कॉलनीत राहणारे भिकाजी नारायण बावचे (वय ७९) या वृध्द इसमाने अज्ञात कारणाने राहते घराच्या हुकाला सुताच्या दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली असून पोलीसात आकस्मात मयत अशी नोंद झाली आहे. दि. २३ रोजी सकाळी ९ पुर्वी सुताच्या दोरीने गळफास घेवून आत्महत्या केली असल्याची खबर नातू सिध्देश्वर संजय बावचे याने पोलीसात दिली आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.





## व्यक्तिगत विकासासाठी स्नेहसंमेलन उपयुक्त : डॉ.कुलकर्णी

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुंडफनेवाडीत स्नेहसंमेलन**

**श्रीपूर** : विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ म्हणजे शाळेचे स्नेहसंमेल असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिगत विकासासाठी स्नेहसंमेलन उपयुक्त ठरते स्नेहसंमेलनातील विविध उपक्रमामुळे विद्यार्थी घडले जातात. असे प्रतिपादन स्नेहसंमेलच्या वेळी पांडुरंग कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

माळशिरस तालुक्यातील महाळुंग केंद्रामधील जिल्हा परिषद शाळा मुंडफनेवाडी या शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत विकासासाठी अभ्यासाबरोबर विविध स्पर्धा उपक्रम सांस्कृत कार्यक्रम या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात भविष्यातील कलाकारांचा पाया इथेच घातला जातो असे म्हटल्यास वागे होणार नाही आणि म्हणूनच शाळा शिक्षक पालक यांच्याप्रमाणे विद्यार्थी देखील स्नेहसंमेलनचे आतुरतेने वाट पाहत असतात, सामान्य मुलाप्रमाणे विशेष मुलांसाठी स्नेहसंमेलन खूप महत्त्वाचे असते विशेष मुलांमध्ये असलेल्या क्षमता जास्तीत जास्त वापर करून त्यांचे अभिनव विश्व समृद्ध करणे यांना दैनंदिन जीवन कौशल्यामध्ये स्वावलंबी बनवणे आणि पुढील आयुष्याच्या दृष्टीने आत्मनिर्बन करणे हे विशेष मुलांच्या शिक्षणाच्या व्यापक दृष्टीने अंतिम ध्येय असते असे मत डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी व्यक्त करत मुलांचे कलागुणांचे कौतुक केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाळुंग-श्रीपुर नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष भिमराव रेडे-पाटील, माळशिरस तालुका गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तार अधिकारी हर्षवर्धन नाचणे, केंद्र प्रमुख नितीन साने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राणी महेश पाटील, शाळेचे मुख्याध्यापक समीर लोणकर, आर्चना वाघमॅडम आदी उपस्थित होते.

## शिवजयंती मिरवणुकीत तरुणाचा मोबाईल पळवला

**सोलापूर** : मित्रांसोबत शिवजयंती मिरवणूक पाहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा मोबाईल अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन तरुणाच्या पॅन्टच्या खिशात हात घालून चोरून नेल्याची घटना दि.१९ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजण्याच्या दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील ब्रह्मदेवदादा माने बँकेजवळ घडली.याप्रकरणी अमोल अनिल मिसाळ (वय-३१,रा.देशमुख वस्ती,लक्ष्मी पेठ, सोलापूर) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

## सांडपाणी सोडणे बंद करा : पाटील

**उत्तर सोलापूर** : चिंचोळी आउद्योगिक वसाहती मधील सांडपाणी कोंडी परिसरात आल्याने नुकसान होत आहे. सांडपाणी सोडणाऱ्या कंपनीवर कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन छेडू असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष, ग्रापांचायत सदस्य गणपत पाटील यांनी जिल्हा अधिकारी मिलिंद शंभरकर, प्रदूषण मंडळ विभागाला दिला आहे.



चिंचोळी एम आय डी सी मधील श्रीकृष्ण कंपनी, बैतुल कंपनी, फरफर कंपनी, जेवण तयार करणारी कंपनी मधील सांडपाणी कोंडी परिसरात सोडले जात आहे. यामुळे शेतातील पिकांचे नुकसान होत आहे, शेतकऱ्यांची जमीन नापीक होत आहे. परिसरात दुर्गंधी पसरत आहे.स्थानिक ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. जनावरे व भटके प्राण्याचा वावर वाढल्याने शेतीचे नुकसान होत असून पिकाचे नुकसान होत आहे.

मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावा लागत आहे. संबधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, भटके प्राण्याचा बंदोबस्त करावा, सांडपाणी सोडणाऱ्या कंपनीवर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी अमोल निळ, अजित पाटील, दतात्रय पाटील, अमर भोसले उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर Classified

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

# आर्थिक मदत केल्याने तमाशा कलावंत भारावले

सुराज्य/अकलूज

अकलूज शंकरनगर येथे महाशिवरात्र यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली यामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे मनोरंजनासाठी लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात आले होते पण याला मिळालेला अल्प प्रतिसाद पाहून महाशिवरात्र यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी समय सूचकता दाखवत तमाशा कलावंतांना आर्थिक मदतीचा हात देत ५० हजार रुपयाची मदत केली. यामुळे विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर लोकनाट्य तमाशा मंडळातील सर्वच कलाकार भारावून गेले.



कलाकारांप्रति नेहमीच जयसिंह मोहिते पाटील यांनी आदरभाव ठेवला आहे अनेक कलाकारांना त्यांनी जोपासण्याचे महान कार्य केले आहे. याचीच प्रचिती पुन्हा एकदा आली अकलूज येथे महाशिवरात्र निमित्त भरलेल्या यात्रेमध्ये विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांच्या लोकनाट्य तमाशा चे आयोजन करण्यात आले होते यंदा यात्रेला मोठा प्रतिसाद मिळाला असला तरी लंपि या आजारामुळे जनावरांचा बाजार भरू शकला नाही आणि त्यामुळे तमाशा पाहण्यासाठी लोकांची गर्दी कमी पाहायला मिळाली ही बाब ज्यावेळेस अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या निदर्शनास आली त्यावेळेस त्यांनी यात्रा महोत्सव समितीच्या वतीने तमाशा कलावंतांना ५० हजाराची मदत दिली.

विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांचे सुपुत्र कैलास नारायणगावकर यांनी या रकमेचा स्वीकार करत आभार व्यक्त केले. नेहमीच या कलाकारांच्या पाठीशी बाळदादा उभे राहिले आहेत त्यांना प्रतिवर्षी कार्यक्रम सादर करताना यात्रा कमिटी कडून वीज,पाणी आणि संरक्षण मोफत दिली जाते. यावेळी यात्रा महोत्सव सांस्कृतिक कमिटीचे प्रमुख लक्ष्मणतात्या आसबे, सुभाष दळवी, महादेव अंधारे, तात्या एकतपुरे आदी उपस्थित होते.

> अकलूजकरांनी नेहमीच कलाकारांच्या पाठीशी उभे राहत नेहमीच मदत केली आहे. मोहिते पाटील या कुटुंबाने नेहमीच तमाशा कलावंतावर अपार प्रेम केले आहे. त्यांच्यामुळे आमच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय मिळताना दिसतो. अल्प प्रतिसाद मिळताच त्यांनी केलेली मदत आमच्यामध्ये स्फूर्ती निर्माण करणारी आहे.
>
> **- कैलास नारायणगावकर,**
> विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांचे चिरंजीव



## इर्ले येथे कृषी व पशुसंवर्धन विभागाकडून शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण

**वैराग** : बार्शी तालुक्यातील इर्ले येथे महाराष्ट्र शासन कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) बार्शी यांच्या वतीने कौशल्य विकास शेतमजूर/ शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना मूरघास निर्मिती कशी करावी याची संपुर्ण माहिती आत्मा चे प्रकल्प संचालक मदन मुकणे यांनी दिली.यावेळी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री कल्पक चाटी, पशुधन विकास अधिकारी डॉक्टर रामकृष्ण पाटील, डॉक्टर वैभव पासले, कृषी सहाय्यक कस्तुरे मॅडम, देहात कंपनीचे कृषी तज्ञ दीपक पाटील,प्राध्यापक राजकुमार शिंदे,तसेच इरले ग्रामपंचायतचे पदाधिकारी व शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## अनुदानसाठी रयत क्रांती संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील बहुतांश शेतक-यावरती अन्याय होत आहे. पिक विमा, व अतिवृष्टीचे अनुदान शासनाकडून मंजूर होऊन देखील अद्यापपर्यंत बहुतांश शेतक-यांना अनुदान दिले गेले नाही. रयत क्रांती संघटनाकडून याबाबत तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांना निवेदन देण्यात आले. शेतकरी, कष्टकरी, कामगार, मोल मजूर, शेत मजूर सोबत रयत क्रांती संघटना नेहमी उभी आहे. शेतक-या वरती अन्याय होता कामा नये, त्वरीत पिक विमा, व अतिवृष्टीचे अनुदान शेतकर्यांचा खात्यात वर्ग करण्यात यावे. अन्यथा रयत क्रांती संघटने च्या वतीने मोठा आंदोलन पुकारण्यात येईल असा इशारा रयत क्रांती संघटनेकडून देण्यात आला. या प्रसंगी जिल्हा महिला अध्यक्ष तनुजा जवळे, अक्कलकोट तालुका अध्यक्ष नागेश नायकोडी, महिला आघाडी तालुका अध्यक्ष प्रियांका दोड्याळे, तालुका युवक अध्यक्ष प्रकाश बिराजदार, तालुका कार्याध्यक्ष रमेश भंगे आदी उपस्थित होते.



## वेळापूर येथे रणरागिणींनी साजरी केली गाडगेबाबा महाराज यांची जयंती

**वेळापूर** : वेळापूर (ता. माळशिरस) येथील विश्वकर्मा सुतार समाज मंदिर येथे रणरागिणी ग्रुप यांच्या वतिने राष्ट्र संत महाप्रबोधनकार गाडगेबाबा महाराज यांची जयंती उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन माजी प.स. सदस्या सौ.रेणूका माने-देशमुख यांनी केले होते. प्रतीमा पुजन अनुराधा काटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सौ. विद्या देशपांडे,सौ.पुष्पांजली टकले, यांनी संतगाडगेबाबा महाराज यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले. सौ. अनुराधा काटकर यांनी गाडगेबाबा यांच्या विषयी माहिती सांगितले. या कार्यक्रमला विनीता देशपांडे, अंजली पालकर, मंजुषा माने-दे. शितल माने-दे., अंजली उरणे , निलम माने दे, सुलभा उरणे ,वर्षा इंगोले, पुनम इंगोले, विद्या इनामदार, विजया इनामदार ,योगीता इंगोले आदी. उपस्थित होते.



## बिराभाई शिंदे यांच्या संकल्पनेतून व लोकसहभागातून सीसीटीव्ही बसविले

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील बिराभाई शिंदे यांच्या संकल्पनेतून व लोकसहभागातून एकाच दिवसात ५० हजार रुपये गोळा करुन बचेरी चौकात सि सिटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले.खरे तर गेल्या काही दिवसापासून बचेरी येथे चोऱ्यांचे प्रमाण खुप वाढले आहे. बचेरी येथे चार हि सिटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत .या चारही कॅमेऱ्याच्या कंट्रोल आय सि डी ग्रामपंचायत कार्यालयात बसविण्यात आल्या आहेत.या सिसिटीव्ही कॅमेऱ्याचे उदघाटन पिलीव औट पोस्टचे पोलीस उपनिरीक्षक पुजारी एम एम ,बचेरीचे सरपंच महादेव पाटील, ग्राम पंचायत सदस्य विश्वजीत गोरड,हवालदार पंडीत मिसाळ, देणगीदार, व इतर ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खरेतर बचेरीसारखया छोटयाशा दुष्काळी भागात सिसिटीव्ही कॅमेरे बसविले याबद्दल येथील ग्रामस्थांनचे अभिनंदन व कौतुक होत आहे. पिलीवसारख्या मोठी बाजारपेठ असणाऱ्या गावात मोठ मोठया चोऱ्या झाल्या. अपघात होतात पण याठिकाणी सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्याची चर्चा मोकळीच चालू आहे.

## शिवबसव संस्थेच्यावतीने रक्तदान शिबिर

**अक्कलकोट** : मैंदर्गी येथील शिव बसव बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आला होता. या शिबिरात जवळपास ५१ रक्तदात्यानी आपली सहभाग नोंदविला. तत्पुर्वी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समाजसेवक, उद्योजक सुरेश अण्णा नागुर, संजय भत्ता, किरण लोणी, गणेश गोब्बूर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी संस्थापक अध्यक्ष राजेंद्र मुंडोडगी , संजय मोरे, संगमनाथ मुंडोडगी, आदर्श पटणे, सुरज पाटील, मल्लिनाथ हुलमनी, सुधिर लाळसंगी, विशाल मुनोळी आदि उपस्थित होते.

# औरंगाबाद आणि उस्मानाबादच्या नामांतराला केंद्र सरकारची मंजुरी

सुराज्य/मुंबई

**औरंगाबाद आणि उस्मानाबादच्या नामांतराबाबत सर्वांत मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर येत आहे. या जिल्ह्यांच्या नामांतरासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवला होता. राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्राने मंजुरी दिली आहे. त्यानुसार, औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचं नाव धाराशीव करण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत ट्वीट करत माहिती दिली.**

उस्मानाबाद आणि औरंगाबाद जिल्ह्याच्या नामांतराचा मुद्दा अनेक वर्षांपासून वादग्रस्त ठरतोय. १९८८ मध्ये बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वप्रथम औरंगाबादचं संभाजीनगर नामांतर करण्याची घोषणा केली होती. १९९५ ला औरंगाबाद महापालिकेने हा ठराव घेतला होता. तत्कालीन मंत्रिमंडळाने अधिसूचनाही काढली होती. मात्र हे प्रकरण कोर्टात पोहोचले आणि नामांतर विरोधात निकाल लागला. दरम्यानच्या कालावधीत युती सरकार गेल्याने हा मुद्दा लांबणीवर पडला. ३० वर्ष शिवसेना याच मुद्द्यावरून निवडणूक लढवत आहे.

इम्तियाज जलील यांचा विरोध : औरंगाबाद हे ऐतिहासिक शहर असून या गावाच्या नामांतरावर जनतेचीही सहमती नाहीये, असे मत औरंगाबादचे एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी केली होती. शहराचे नाव औरंगाबाद ठेवायचे की संभाजीनगर, यावर लोकांचे मतदान घ्यावे, अशी मागणी काही दिवसांपूर्वी इम्तियाज जलील यांनी केली होती.

दरम्यान, महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आले.एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंडखोरी केल्याने महाविकास आघाडी




सरकार कोसळणार असल्याचं चित्र स्पष्ट होताच तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या शेवटच्या मंत्रीमंडळ बैठकीत नामांतराबाबतचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. परंतु, शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर येताच त्यांनी ठाकरेंच्या सर्व प्रस्तावांना स्थगिती आणली. यामुळे नामांतराचा प्रस्तावही स्थगित झाला. दरम्यान, पावसाळी अधिवेशनात शिंदे सरकारने औरंगाबाद आणि उस्मानाबादच्या नामांतराचा प्रस्ताव मंजूर केला. त्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारडे मंजुरीकरता पाठवण्यात आला होता.

उस्मानाबाद आणि औरंगाबादचे नामांतर करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान केंद्र सरकारकडून उस्मानाबादचे नाव धाराशिव करण्याला मंजुरी मिळाली असून औरंगाबादच्या नामांतरासाठी केंद्राने मंजुरी दिली नसल्याची बाब स्पष्ट झाली होती. त्यामुळे केंद्रात आणि राज्यात एकच पक्ष असतानाही राज्य सराकारच्या प्रस्तावावर अद्यापही मंजुरी मिळत नसल्याने विरोधकांनी राज्य सरकारवर टीकास्त्र डागलं होतं. अखेर, आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करत नामांतराच्या प्रस्तावाला केंद्राकडून मंजुरी मिळाली असल्याची माहिती दिली.

## कस्तुरबाई कॉलेजमध्ये शैक्षणिक धोरण आणि नॅक विषयावर परिषद

**सोलापूर** : कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर येथे शिक्षक शिक्षणातील आव्हाने आणि सध्याची बदलती परिस्थिती या विषयावर रविवार दि. २६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय परिषद घेण्यात येणार आहे.

या परिषदेची सुरुवात सकाळी १० ते ११ या वेळेत नोंदणी तसेच ११ ते १२ या वेळेत उद्घाटनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या परिषेदेचे उद्घाटन प्राचार्य, डॉ. विजयकुमार आठवले यांच्या शुभहस्ते होणार आहे.

या परिषेदेत महाराष्ट्रातील ज्येष्ठ शिक्षण तज्ञ डॉ.ह.ना. जगताप हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२०' या विषयावर व्याख्यान देणार आहेत. त्यानंतर दुपारी १२ ते १ या वेळेत वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी हे NC ccreditation Process या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

सोलापूर विद्यापीठ ॥ विद्यया संपन्नता ॥

दुपारी तीन ते पाच या वेळेमध्ये सहभागी संशोधक, प्राध्यापक, शिक्षक यांचे संशोधन पर लेखाचे सादरीकरण होणार आहे. सोलापूर परिसरातील व जिल्ह्यातील शिक्षण प्रेमी व उच्च शिक्षण विभागात कार्य करणारे तज्ञ मार्गदर्शक, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकानी या कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. अश्विन बोन्दार्डे यांनी केले आहे.तरी या कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. दत्ता वाघमारे आणि खठ्ठ समन्वयक डॉ. बाळकृष्ण भावे हे काम पाहत आहेत.




## झोपडपट्टीचे भवितव्य पुस्तक विकासासाठी मार्गदर्शक : मेहता

### लेखक दत्तात्रय अंबुरे यांच्या 'झोपडपट्टीचे भवितव्य' पुस्तकाचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

झोपडपट्ट्यांचा विकास साधत असताना आणि विविध योजना आखत असताना झोपडपट्टीचे भवितव्य हे इंजिनियर दत्तात्रय अंबुरे यांनी लिहिलेले पुस्तक मार्गदर्शक ठरू शकते, असा विश्वास असोसिएशन ऑफ कन्सल्टींग सिव्हिल इंजिनियरचे अध्यक्ष अमोल मेहता यांनी व्यक्त केला आहे. लेखक इंजिनीयर दत्तात्रय अंबुरे यांनी लिहिलेल्या आणि जागृती पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या झोपडपट्टीचे भवितव्य पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवारी दुपारी स्थापत्य प्रदर्शनात करण्यात आले.

त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जेष्ठ कवी देवेंद्र औटी, इंजिनीयर विनायक जोशी, भगवान जाधव, मनोज महिंद्रकर, प्रशांत मोरे, सिद्धाराम कोरे, इफ्तेकार नदाफ, मनोहर लोमटे, उमेश हेडगिरे, चंद्रमोहन बत्तुल, जागृती पब्लिकेशनचे प्रकाशक विजय गायकवाड, सुरेश नारायणकर, उपस्थित होते. लेखक दत्तात्रय अंबुरे यांनी स्वतः झोपडपट्टीत राहून पुढे जिद्दीने आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. आणि झोपडपट्ट्यांचा विकास साधण्यासाठी झोपडपट्टीतील प्रश्न आणि त्याची उत्तरे सांगण्याचे कार्य लेखकाने केले आहे. विकासाची योजना आणि आराखडा आखत असताना अशा अभ्यासू व्यक्तींचा सरकारने विचार करावा, अशी अपेक्षाही मेहता यांनी व्यक्त केली. प्रारंभी प्रास्ताविकात कवी देवेंद्र औटी यांनी झोपडपट्टीतील प्रश्न सोडवण्यासाठी आणि भविष्यात झोपडपट्टी होऊ नये, यासाठी हे पुस्तक दिशादर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. स्वागत लेखक दत्तात्रय अंबुरे यांनी केले. तर शेवटी आभार जागृती पब्लिकेशनचे प्रकाशक विजय गायकवाड यांनी मानले.

## कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेचा लाभ घेण्यासाठी २७ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावा

### महापारेषणचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महापारेषणमधील जे कर्मचारी दि. १ सप्टेंबर २०१४ रोजी कर्मचारी निवृत्ती वेतन योजना-१९९५ या योजनेचे सदस्य आहेत. तसेच या योजनेअंतर्गत निवृत्ती वेतन प्रत्यक्ष वेतनावर घेण्यासाठी इच्छूक आहेत, अशा कर्मचाऱ्यांनी आपला अर्ज संबंधित कार्यालयांमध्ये जमा करावा, असे आवाहन महापारेषणच्या वतीने करण्यात येत आहे.

कर्मचाऱ्यांनी सादर केलेले संयुक्त पर्यायी अर्ज सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाच्या ठिकाणी अथवा सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाकडे दि.२७ फेब्रुवारी २०२३ पर्यत सादर करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर, प्रत्यक्ष वेतनावरील कंपनीचा ८.३३ टक्के वाटा विहित व्याजासह कर्मचारी भविष्य निर्वाह निधी पेन्शन फंडात म.रा.वि.मंडळ, भविष्य




निर्वाह निधी विश्वस्त मंडळाव्दारे जमा करण्यात येणार आहे. ज्या माजी कर्मचाऱ्यांची अंतिम भविष्य निर्वाह निधीची पूर्ण रक्कम अद्यापही म.रा.वि.मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळाकडे जमा असेल, अशा माजी कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ती रक्कम म.रा.वि. मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळामार्फत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

सन १९९५ पासून सर्व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या भविष्य निर्वाह निधी बाबतची सर्व माहिती सचिव, म.रा.वि. मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ या विभागाकडून त्यांच्या पोर्टलवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने दि.१ सप्टेंबर २०१४ पूर्वी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतनासंबंधीचा पर्याय निवड करण्याकरिता संयुक्त पर्यायी नमुना अर्ज त्यांचे वेबसाईटवर जाहीर केलेला आहे. महापारेषण कंपनीमधील भविष्य निर्वाह निधी अधिनियमानुसार निवृत्ती वेतनास पात्र असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत माहिती, नव्याने लागू होणाऱ्या निवृत्ती वेतन संदर्भात माहिती, संबंधित कर्मचाऱ्यास निवृत्ती वेतन योजनेकरिता भरावी लागणारी अंदाजित रक्कम आणि नव्याने लागू होणारी निवृत्ती वेतनाची अंदाजित रक्कम इत्यादी बाबतची माहिती सीपीएफ पोर्टलवर उपलब्ध आहे.

## कणेरी मठात ५२ गायींचा मृत्यू

**कोल्हापूर** : जिल्ह्यातील कणेरी मठात पंचमहाभूत महामंगल सोहळा सुरू आहे. मात्र, या सोहळ्याला गालबोट लागलं आहे. या ठिकाणी असलेल्या गोशाळेत तब्बल ५२ गायींचा मृत्यू झाला आहे. गोशाळेतील या देशी गायींना कालचे शिळे अन् खायला घातल्याने या ५२ गायी दगावल्या असून आणखी ३० गायींना विषबाधा झाली आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. कोल्हापुरातील कणेरी मठात पंचमहाभूत लोकोत्सव सुरू आहे.

## गाडगेबाबांच्या समाजमंदिरासाठी ३५ लाख रुपये निधी मंजूर : आ. पाटील

सुराज्य/सांगोला

सांगोला शहरात राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या समाजमंदिर उभारणीसाठी ३५ लाख रुपयांचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मंजूर केला असून लवकरच जागेचीही उपलब्धता करून १ कोटी रुपये खर्चून भव्य दिव्य असे समाजमंदिर उभे करून देऊ, असे अभिवचन आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांनी दिले. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या १४७ व्या जयंतीनिमित्त परीट गल्ली, सांगोला येथे आयोजित कार्यक्रमात ॲड. शहाजीबापू पाटील प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, डॉ. बाबासाहेब देशमुख, चेतनसिंह केदार, खरेदी-विक्री संघाचे नूतन चेअरमन रमेश जाधव, डॉ. पियुषदादा साळुंखे, अनिल खडतरे, खंडू सातपुते, सुरज बनसोडे, बापूसाहेब ठोकळे, संजय देशमुख, गुंडादादा खटकाळे, शिवाजी जावीर, दुय्यम निबंधक चव्हाण साहेब, समाधान सावंत, गजानन भाकरे, अच्युत फुले, पत्रकार हमीदभाई इनामदार, बापूसाहेब भाकरे, प्रताप इंगोले, वसंत सुपेकर, हरिभाऊ



जगताप, प्रकाश भोसले, सिद्धेश्वर झाडबुके, विलास म्हेत्रे, सुरेश फुले, शंभु माने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष दादा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजेंद्र यादव यांनी केले. कार्यक्रमाला शहर व तालुक्यातील नागरिक, महिला भगिनी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीट समाज सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## चिंचवडमध्ये १४ लाखांची रोकड जप्त

### प्रचाराच्या शेवटच्या दिवशी नोटांचा पाऊस

सुराज्य/पुणे

कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीचा प्रचार मागील काही दिवसांपासून सुरू होता. परंतु या प्रचाराचा शेवट आज झाला. २६ फेब्रुवारी रोजी दोन्ही मतदारसंघात मतदान पार पडणार आहे. तसेच २ मार्चला या निवडणुकीचा निकाल हाती येणार आहे. परंतु सर्वात धक्कादायक बाब म्हणजे प्रचाराच्या शेवटच्या दिवशी नोटांचा पाऊस पडला. यावेळी चिंचवडमध्ये १४ लाखांची रोकड जप्त करण्यात आली.

चिंचवडमध्ये १४ लाखांहून अधिकची रक्कम जप्त करण्यात आली आहे. चिंचवडमधील दळवीनगरमध्ये ही रक्कम घेऊन जाणारी कार ताब्यात घेतली आहे. पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही रोकड सापडल्याने खळबळ उडाली आहे. ही रोकड कोण, कुठे आणि कशासाठी घेऊन जात होता, याचा तपास निवडणूक आयोग आणि




पोलिसांकडून केला जात आहे. १० तारखेला देखील याच दळवीनगर भागात निवडणूक विभागाच्या पथकाने ४२ लाखांची रोकड ताब्यात घेतली होती. मात्र, आता चिंचवडमध्ये आचारसंहिता लागू आहे. अनेक ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली असून वाहनांची तपासणी केली जात आहे. ज्यात एकीकडे सत्तासंघर्षाचा पेच निर्माण झालेला असताना दुसरीकडे पुण्यात पोटनिवडणुकींचा रणसंग्राम सुरू आहे.

## मैंदर्गीचे यशस्वी युवा उद्योजक सुरेश नागूर

उद्योजक हा निर्णय होणारा,दिशा देणारा, विकासाचा ध्यास घेणारा असतो.जिद्द, धैर्य, साहस, स्वकष्टाच्या माध्यमातून माणूस यशस्वी होतो.असेच एक स्वकर्तृत्वावर, मेहनतीने कमी कालावधीत जनसामान्यात आपला ठसा उमटवणारे मैंदर्गीचे सुपुत्र यशस्वी युवा उद्योजक श्रीमान सुरेश (अण्णा) नागूर होय. श्री सुरेश विठ्ठल नागूर यांचा जन्म- मैंदर्गी येथील एका गरीब होतकरू शेतकरी कुटुंबात झाला.त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मैंदर्गी येथे जि. प.मराठी शाळा श्री शिवचलेश्वर हायस्कूल येथे पूर्ण झाले.इ.१० वी मध्ये शिकत असताना त्यांनी वडिलांचे छत्र-छाया हरवले.कठिण परिस्थितीत माणसाला शिकवत व घडवत असेच त्यांच्या बाबतीत झाले.

वडिलांच्या निधनानंतर त्यांना जीवनात पोकळी वाटत होते.अशा वेळी धीर व आधार देण्यासाठी कुणी पुढे येत नव्हते.त्यावेळेला त्यांनी ठरवले की, आपण काही तरी काम केलेच पाहिजे म्हणून त्यांनी व्यवसायाची ज्ञान मिळविण्यासाठी काम करण्यास कर्नाटकातील अफझलपुर येथील आजोळ असलेल्या कलकेरी यांच्या परिवारात राहून उद्योग व्यवसाय शिकण्यासाठी अहोरात्र काम करू लागले, सुरुवातीला त्यांनी 'विजयानंद रोडलाईन्स ट्रान्सपोर्ट मध्ये- ५-६ वर्षे काम केले. कर्नाटकातील विविध भागात विविध व्यवसायकांशी संपर्क वाढविला. प्रामाणिकपणाने,मेहनितीने ते यशस्वी होऊ लागले. जनसंपर्क वाढल्याने ट्रान्सपोर्टच्या माध्यमातून सन २०११ साली ते स्वतःचा ट्रान्सपोर्ट गुलबर्गा येथे विनायक लॉजिस्टिक प्रा. लिमिटेड कंपनीचे स्थापन केली.देशभरातील सहकारी साखर कारखान्यातील मळी (मैलासेस) व्यवसायात ऋतू लागले.या व्यवसायाच्या माध्यमातून ते स्वत:ला झोकून दिले. व हळूहळू हा व्यवसाय वृद्धोगत होत गेला. दक्षिण भारतामध्ये सहकारी साखर कारखान्यातून मळी (मैलासेस) रेल्वेने वाहतूक करणारे ते पहिले यशस्वी उद्योजक ठरले आहेत.



प्रत्येक माणसाच्या जीवनात एक जन्मभूमी व कर्मभूमि महत्त्वाचे असतात,त्या प्रमाणे त्यांनी कर्मानी उंच भरारी घेऊ लागले,हे व्यवसाय करत असताना तरी आपल्या गावाला कधीच विसरले नाहीत.उद्योग क्षेत्रात प्रगती करत ते गावातील जनतेसाठी काहीतरी करावे असे नेहमी त्यांना वाटायचे. एक सामान्य कुटुंबातून असामान्य व्यक्तिमत्व श्री सुरेश (अण्णा) नागूर यांच्यात दिसून आले ते मैंदर्गी जनतेसाठी सन २०२२ मध्ये दिवाळी सणा नंतर कर्नाटकातील कोप्पळ येथील आंतरराष्ट्रीय सुप्रसिद्ध प्रवचनकार गवि सिध्देश्वर महास्वामीजी यांच्या अमृतवाणी ने मैंदर्गी शहर व पंचक्रोशितील जनतेला धार्मिक व आध्यात्मिक ज्ञानाच्या भर मिळवून दिले.शाळा व महाविद्यालयातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करु लागले.त्यांचा ध्येयपूर्तीसाठी माझ्या मैंदर्गी नगरातील मुले यशस्वी व्हावे.यासाठी ते धडपडत असतात. याच बरोबर धार्मिक कार्यात ते नेहमी अग्रेसर असतात पालखी महोत्सव, यात्रा विविध धार्मिक कार्यक्रमात महाप्रसादाची सोय करतात,व लोकांचे विविध प्रश्न प्रसिध्दीस न येता ते सोडवित असतात.ते निगर्वी, शांत संयमी स्वभाव, नम्रपणा चे असून, जनहितश्री लोक कल्याणकारी मैंदर्गी नगराचे विकास हा एकमेव उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून निस्वार्थी पणे काम करतात. या नगराचे विकास, लोकांचा विकास, साधे राहणीमान,उच्च विचारसरणी, उदात्त ध्येय ठेवणारा एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे सुरेश (अण्णा) नागूर होय.. कुशल नेतृत्व असलेल्या श्री.सुरेश ( अण्णा) नागूर यांना आज वाढदिवसाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा व पुढील यशस्वीतेसाठी खूप खूप शुभेच्छा..!

# गर्भवती महिलांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृहाचे उद्घाटन

## ▶▶ अद्ययावत प्रसूतीगृहात सर्वोत्तम आरोग्य सेवा मिळेल : आयुक्त ▶▶ खण-नारळाने ओटी भरली; पहिल्या दिवशी लक्ष्मी जन्मली

✔ सुराज्य/सोलापूर

बालाजी अमाईन्स कंपनीच्या एक कोटी ३० लाख रुपये सी. एस आर फंडातून डफरीन चौक येथील सोलापूर महानगरपालिकेच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसूतिगृहाचे उद्घाटन अक्षता महेश कासट, संजना चिदानंद उपाध्ये, प्रीती आकाश राऊत, ज्योती आकाश शिरगिरे, सृष्टी गणेश बोधले, भाग्यश्री हेमंत तुगावे या गर्भवती महिलांच्या हस्ते शुक्रवारी दुपारी करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले, बालाजी अमाईन्सचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राजेश्वर रेडी, तांत्रिक सल्लागार मल्लिनाथ बिराजदार, महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसूतिगृहात उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी दुपारी एक मुलगी जन्माला आली तर प्रसूती, ८ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, ४ एनटीपी अशा आरोग्य सेवांचा लाभ देण्यात आला.

याप्रसंगी बोलताना आयुक्त शीतल तेली - उगले म्हणाल्या, बालाजी अमाईन्सच्या एक कोटी तीस लाख रुपये सीएसआर निधीतून तसेच महापालिकेच्या काही रकमेतून हे हे प्रसूतिगृह अत्याधुनिक, सुसज्ज असे करण्यात आले आहे. पाच गर्भवती महिलांच्या हस्ते उद्घाटन करून हे प्रसूतिगृह खुले करण्यात आले आहे. सर्व डॉक्टर व कर्मचारी यांच्या पथकांच्या मदतीने या ठिकाणी अधिकाधिक उत्तम सेवा देण्यात येईल, असे सांगत प्रसूतिगृहात सर्वोत्तम , सुलभ अशी आरोग्य सेवा मिळेल. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. उपायुक्त विद्या पोळ, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, वास्तुविशारद मनोज मर्दा, आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोडल, डॉ. तन्वगी जोग,डॉ. शिरशेट्टी, बालाजी अमाईन्सचे पीआरओ प्रसाद सांजेकर यांच्यासह डॉक्टर्स - कर्मचारी उपस्थित होते. या प्रसूतिगृहात आवश्यक असलेले एकूण ५४ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत. यामध्ये वैद्यकीय अधिकारी ३, मेटरन २, कनिष्ठ लिपिक १, मिश्रक १, मिडवाईफ १७, शिपाई - ४, आया -१८, सफाई कामगार - ८ असे एकूण ५४ जणांचा स्टाफ इथे उपलब्ध राहणार आहेत.

### कॉर्पोरेट हॉस्पिटलप्रमाणे सुविधा उपलब्ध : राजेश्वर रेड्डी

बालाजी अमाईन्सच्या सीएसआर फंडातून एक कोटी तीस लाख रुपये खर्चून हे प्रसूतीगृह अद्यावत व सुसज्ज करण्याची संधी मिळाली. याचे समाधान वाटते. गरीब, मध्यमवर्गीय लोकांना खाजगी व कार्पोरेट अशा हॉस्पिटलमध्ये जाऊन आरोग्य सेवा घेता येत नाहीत. हे लक्षात घेऊन कॉर्पोरेट हॉस्पिटल प्रमाणेच येथील प्रसूतीगृहात सर्व सोयी – सुविधा व यंत्रणा उपलब्ध करण्यात आले आहेत. याचा चांगला लाभ होईल, असे बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राजेश्वर रेड्डी यांनी व्यक्त केला.

### ओटी भरून गर्भवती महिलांचा सन्मान

पाच गर्भवती महिलांच्या हस्ते हॉस्पिटलचे उद्घाटन झाल्यानंतर त्या महिलांचा महापालिका आयुक्त शितल तेली – उगले, उपायुक्त विद्या पोळ यांच्या हस्ते खण – नारळाने ओटी भरून सन्मान करण्यात आला. यावेळी हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.



# राऊतांचे आडनाव बदलून आगलावे करा

## शहाजीबापू पाटलांची उपहासात्मक टीका

✔ सुराज्य/सोलापूर

''संजय राऊत यांचं नाव बदलून संजय आगलावे असं करायला हवं'', अशी उपहासात्मक टीका आ. शहाजीबापू पाटील यांनी केली. त्यामुळे पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण तापण्याची शक्यता आहे.



एकनाथ शिंदे यांच्या गटाला शिवसेना पक्ष आणि चिन्ह मिळाल्यानंतर शिंदे गट आणि ठाकरे गटाच्या नेत्यांमध्ये चांगलेच आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. संजय राऊत यांनी मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांच्यावर जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर त्यांनी लगेच उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर टिका केली होती. त्याला सुरूवातील आ. राम सातपुते यांनी उत्तर दिले होते. तर आता आमदार शहाजी बापू पाटील यांनी खासदार संजय राऊत यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

शहाजीबापू पाटील म्हणाले, ''संजय राऊत यांचे आडनाव बदलून संजय आगलावे असं ठेवायला हवं. कारण ते महाराष्ट्रभर आग लावत फिरत आहेत. रोज सकाळी सकाळी ते उठतात आणि महाराष्ट्रभर आग लावण्याचे काम ते करतात. त्यामुळे नाव बदलून संजय आगलावे असं ठेवायला पाहिजे.



खा. श्रीकांत शिंदे हे चांगलं काम करणारं तरुण नेतृत्व आहे. पण ते अशा तरुण नेतृत्वावर असे आरोप करतात. त्यांना हे शोभत नाही. संजय राऊत यांनाच काय ते कुणालाच शोभत नाहीत. मात्र, तरी देखील बेभान झालेले राऊत सध्या कुणाविषयी काय बोलतील याचा काही नेम नाही. संजय राऊत हे मातोश्रीशी एकनिष्ठ आहेत असं मला कधीही वाटलं नाही. दरम्यान, संजय राऊत यांच्यावर नुकतेच भाजपाचे आ. राम सातपुते यांनीही टिका केली होती. तुमच्या फालतू गिरीमुळेच उद्धव ठाकरेंना रस्त्यावर येण्याची वेळ आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### शहाजीबापूंमुळे भोसले घरण्याचा अपमान : राऊत

शहाजीबापू पाटील यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केल्यानंतर राऊत यांनीही जोरदार प्रतिउत्तर दिली आहे. शहाजीबापू पाटील यांनीही शहाजी नाव बदललं पाहिजे. यामुळे भोसले घराण्याचा अपमान होतोय'', असा टोला त्यांनी लगावला.

# माता रमाबाई आंबेडकर समुपदेशन केंद्रात कामकाज नाही

## वस्तुस्थितीदर्शक अहवाल पाठविण्याचे महिला आयोगाचे महापालिकेला आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेतील माता रमाबाई आंबेडकर महिला समुपदेशन केंद्र येथील कामकाज होत नाही. या संदर्भात प्रयास बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने केलेल्या तक्रारीची दखल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने घेतली आहे. या संदर्भातील वस्तुस्थितीदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल आयोगाकडे पाठवावा, असे लेखी आदेश महापालिका उपायुक्तांना दिले आहेत.

माता रमाबाई आंबेडकर समुपदेशन केंद्रातून कोणतेही कामकाज होत नाही किंबहुना करत नाहीत या संदर्भात महानगरपालिका प्रशासनास वारंवार पत्रव्यवहार करुन अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याबाबत प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने राज्य महिला आयोगाकडे तक्रार केली होती. महिला आयोगाने याची दखल घेतली असून महापालिकेतील माता रमाबाई आंबेडकर समुपदेशन केंद्राबाबत वस्तुस्थितीदर्शक स्वयंस्पष्ट अहवाल आयोगास पाठवावा असे लेखी पत्राद्वारे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या प्रशासकीय अधिकारी दिपा ठाकूर यांनी महापालिका महिला व बाल विकास विभागाचे उपायुक्तांना कळविले आहे.



मागील वर्षी माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर महापालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत सुमारे ५ लाख रुपये खर्चून हे समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले होते मात्र या समुपदेशन केंद्राच्या कार्यालयातच पालिकेच्या अतिक्रमण विभागाने त्यांचे कार्यालय सुरू केले. यामुळे या समापदेशन केंद्राचे कामकाज होत नव्हते.

# विवाहितेचा छळ; सातजणांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : विवाहितेला स्वयंपाक व घरातील कामे नीट करीत नाहीस, तसेच मुलगी झाल्याच्या कारणावरून संगणमत करत सासरच्या लोकांनी शिवीगाळ करत मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देत छळ केल्याप्रकरणी सासरच्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जयश्री अंबाजी सूर्यवंशी (वय-४३,रा नई जिंदगी,सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती अंबाजी सूर्यवंशी, सासू कांताबाई सूर्यवंशी, सासरे विठ्ठल सूर्यवंशी, दिर विकास सूर्यवंशी, नरेश सूर्यवंशी, नणंद पुनम कुलकर्णी व व अंबाजी सूर्यवंशी यांची दुसरी पत्नी प्रतिभा भाले (सर्व रा. सूर्यवंशी निवास, भगतसिंग शाळेच्या पाठीमागे,रेल्वे स्टेशन रोड, दापोडी, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक कटके हे करीत आहेत.

# ८ मार्चपर्यंत हिरकणी कक्षाची पायाभरणी

✔ **सोलापूर** : जागतिक महिला दिन ८ मार्च रोजी आहे. यापूर्वी प्रत्येक तालुका स्तरावर महिलांसाठी हिरकणी कक्ष तयार करणेचे निसोजन करून त्याची पायाभरणी करा, असे आवाहन सिईओ दिलीप स्वामी यांनी केले. दशसुत्री अभियानाची मसुरी येथील प्रशिक्षण संस्थेत दखल घेण्यात आली आली. याबाबत सविस्तर या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी शाळा स्तरावर होते किंवा नाही याची खात्री करण्याच्या सूचना दिल्या. कार्यरंभ आदेश दिलेली जलजीवन मिशन ची कामे सुरुवात करा, कामे सुरू करून उद्घाटने करा, यात वेळ घालवू नका असे सांगितले. कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी जलजीवन मिशनच्या कामाचा प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे सांगितले.

# अश्विनी रुग्णालयास NBH आणि NBL राष्ट्रीय मानांकने प्राप्त

## चेअरम बिपीनभाई पटेल यांची माहिती

✔ **सोलापूर** : आरोग्य सेवेत अग्रेसर असलेल्या अश्विनी सहकारी रुग्णालयाने NBH आणि NBL ही राष्ट्रीय मानांकने प्राप्त केले आहे, अशी माहिती रुग्णालयाचे संचालक बिपीनभाई पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बिपीनभाई पटेल ही मानांकने प्रदान करणाऱ्या या दोन्ही संस्था राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च संस्था असून नवी दिल्ली येथील QCI (Quality Council of India) स्वायत्त या संस्थेचा भाग असून, आंतरराष्ट्रीय मानांकन देणाऱ्या संस्थेशी संलग्नित आहेत. ही दोन्ही मान्यता मिळवणे हा अश्विनी सहकारी रुग्णालयासाठी एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड आहे. ही नामांकने आमच्या रुग्णांना सर्वोत्तम आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या आमच्या अतूट बांधिलकीचे प्रदर्शन करते. हे आमच्या आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या कार्यसंघाच्या समर्पण आणि कठोर परिश्रमाचा दाखला आहे. रूग्णालयात प्रत्येक रुग्ण उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांसाठी पात्र आहे. ही मान्यता मिळाल्याने आम्हाला आनंद झाला आहे आणि रुग्ण सेवेत उत्कृष्टतेसाठी अश्विनी प्रयत्नशील असेल अशी ग्वाही बिपीनभाईंनी दिली.



यावेळी चेअरमन पटेल यांनी सर्व संचालकांसह सभासदांचा सार्थ विश्वास, तज्ञ डॉक्टरांच्या योगदानाबद्दल आभार मानले. या पत्रकार परिषदेला अभिजीत जिरगे, व्यवस्थापनातील सर्व अधिकारी वर्ग वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजेंद्र घुली, प्रशासकीय संचालक विलास पाटील सह डॉ. गौरी केळकर, डॉ. प्रवीण रेणके, डोक. अभीजित जिर्गे हे उपस्थित होते.

# सहायक अभियंता सुनील लामकाने सेवेतून निलंबित

✔ **सोलापूर** : लाच प्रकरणात गुन्हा दाखल असलेले महापालिकेतील गवसु तांत्रिक विभागातील सहाय्यक अभियंता सुनिल नेमीनाथ लामकाने यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसे आदेश आज महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी काढले आहेत. सुनील लामकाने सहा.अभियंता या पदी नगर अभियंताच्या ग.ब.सु. (तांत्रिक) विभागाकडे कार्यरत असताना शेळगी स्मशानभूमी येथील डांबरी रस्त्याच्या कामाचे मोजमाप पुस्तिकेवर व बारामती बँक ते आकाशगंगा मंदीर येथील डांबरी रस्ता करणे याकामाच्या मोजमापे पुस्तिकेवर सही करण्याकरिता अनुक्रमे ६ हजार व ७ हजार रुपये असे एकूण १३ हजारची लाच स्विकारत असताना त्यांना दि.१६ फेब्रुवारी २०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहाथ पकडण्यात आले होते.

लामकाने यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे प्रस्तावित असून या कारवाईस बाधा येऊ नये म्हणून त्यांना निलंबनाधिन ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे लामकाने यांना दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ च्या कार्यालयीन वेळेनंतर पूर्वलक्षी प्रभावाने सेवेतून निलंबित करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्तांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

# मधुरा माळी हिची राज्य तलवारबाजीसाठी निवड

✔ **सोलापूर** : जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलमधील उत्कृष्ट खेळाडू इ. ८वीमध्ये शिकत असलेली मधुरा संतोष माळी हिची अहमदनगर या ठिकाणी झालेल्या पुणे विभागीय तलवार बाजी स्पर्धेतून, छ. शिवाजी महाराज क्रीडा संकुल, भंडारा या ठिकाणी होणाऱ्या १४ वर्षाखालील मुलींच्या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेकरिता सायबर या प्रकारात निवड झाली आहे.

सदर खेळाडूला क्रीडाशिक्षक अतुल सोनके, सागर जगझाप, मुख्य तलवारबाजीचे प्रशिक्षक पवन भोसले यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले आहे. यशस्वी खेळाडू मधुरा माळीचे संस्था अध्यक्ष महेश अण्णा कोठे, डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्रा. विलास बेत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा व सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

# राज्य पुरस्कृत योजना व जि.प. सेसअंतर्गत निधी वेळेत खर्च करा

## सीईओ दिलीप स्वामी यांचे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर

राज्य पुरस्कृत योजना व जि प सेस अंतर्गत निधी वेळेत खर्च करा- असे आवाहन सीईओ दिलीप स्वामी यांनी केले. जिल्हा परिषदेंतर्गत विविध योजनांचा निधी खर्च होणेचे दृष्टीने नियोजन करणेचे दृष्टीने सीईओ दिलीप स्वामी यांनी मसुरी येथून व्हीसीचे आयोजन करणेत आले होते.



या आढावा बैठकीस प्रभारी सिईओ संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजय पवार, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालकल्याण) जावेद शेख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड, बांधकामचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनाली बागडे, जिल्हा कृषी विकास अधिकारी विवेक कुंभार, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर, ग्रामीण विकास यंत्रणा विभागाची प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, अभियान व्यवस्थापक सचिन चवरे व सर्व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सीईओ दिलीप स्वामी यांनी कामे वेळेत पूर्ण होत नसलेबद्दल नाराजी व्यक्त केली. जे बाल विकास प्रकल्प अधिकारी वेळेत प्रस्ताव देत नाहीत त्यांना कारणे दाखवा नोटिसा काढण्याच्या सूचना दिल्या. मार्चचा निधी परत गेला तर विभाग प्रमुखांच्या जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे स्पष्ट पणे सांगून वरिष्ठांना अहवाल देण्यात येईल असे सांगितले. जि.प. सेससाठी अंदाजपत्रक वेळेत निधीची मागणी न करणारे विभाग प्रमुख व गटविकास अधिकाऱ्यांची मागणी नाही असे समजून अंदाजपत्रक तयार करणेचे सुचना दिले. मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार यांनी वेळेत निधी मागणी गटविकास अधिकारी यांचे कडून केली जात नसलेबद्दल नाराजी व्यक्त केली. मार्च पर्यंत खर्चाचे निसोजन करा अशा सुचना पवार यांनी दिले.

# सरकारी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस उद्या सोलापूर दौऱ्यावर

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर रविवार दि. २६ फेब्रुवारी रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार असल्याची माहिती सोलापूर जिल्हा सरचिटणीस अमृतराव कोकाटे यांनी दिली.

राज्य सरकारी निमसरकारी, शिक्षक शिक्षकेतर, महानगर पालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांच्या जिव्हाळ्याच्या विविध मागण्या शासन दरबारी मांडण्यासाठी निवेदनाच्या माध्यमातून निवासी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले त्यावेळी कार्याध्यक्ष चन्नय्या स्वामी, कार्यालय सचिव किशोर सावळे, संघटक शिवानंद चडचण, सुरज देवसान, संजय काखंडकी, प्रविण पांचाळ, बनसोडे, एस.सी. दिक्षित यांच्यासह पदाधिकारी मोठयासंख्येने उपस्थित होते. या मागण्या संदर्भात शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा यासाठी तसेच दि. १४ मार्च पासून बेमुदत संपाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर हे सोलापूरला येणार आहेत. रविवार दि. २६ फेब्रुवारी रोजी सातरस्ता येथील शासकीय विश्रामगृहात सोलापूर जिल्हा कार्यकारणी सभा होणार आहे या सभेसाठी सर्व पदाधिकारी आणि कर्मचारी सदस्य येणार आहेत त्या सभेला विश्वास काटकर हे मार्गदर्शन करणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# रामराजेंच्या भाजप प्रवेशाला फडणवीसांकडून नकार

## खा. निंबाळकरांचा गौप्यस्फोट



✔ **सोलापूर** : विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आम्हाला भारतीय जनता पक्षात घ्या; म्हणून हेलपाटे मारत आहेत. पण, फडणवीस यांनी नकार दिल्यामुळे त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली,' असा गौप्यस्फोट भाजपाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केला.

इंग्लंडचे पंतप्रधान आले तरी फलटणची जनता आम्हालाच मतदान करेल, असे विधान रामराजेंनी केले होते. त्यावर खासदार निंबाळकर बोलत होते. ते म्हणाले की इंग्लंडहून पंतप्रधान येण्याची गरज नाही. आमचे उपमुख्यमंत्री फडणवीसच रामराजेंना पुरसे आहेत. अनेक दिवस झाले रामराजे हे फडणवीसांकडे आम्हाला भाजपमध्ये घ्या; म्हणून हेलपाटे मारत आहेत. मात्र, त्याला फडणवीस यांनी नकार दिला, त्यामुळेच बहुतेक रामराजेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली असावी. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतरच सभेतून घड्याळाचे चिन्ह, शरद पवारांचा फोटो गायब झाला होता. फलटणमध्ये असं अनेकवेळा होतं. त्यांना असं वाटलं की मला भाजपमध्ये अथवा शिवसेनेत घेतील, त्यावेळी ते चिन्ह गायब करतात, असाही आरोप निंबाळकरांनी केला.

### दिलेला शब्द पूर्ण करण्याचा निर्धार

नीरा देवघर प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. पंढरपूर लोहमार्गासाठी राज्य सरकारने ५० टक्के वाटा देत निधीची तरतूद केली. त्याच दिवशी फटलणच्या सत्र न्यायालयास मंजुरी दिली. ग्रामीण रुग्णालयाचा आराखडा तयार करायला लावला. तसेच, गडकरी यांनी हजारो कोटी रुपये रस्त्याच्या कामासाठी जाहीर केले, आहेत. लोकसभा निवडणुकीत दिलेला शब्द पूर्ण करण्याचा आमचा निर्धार आहे, असे खा. निंबाळकरांनी सांगितले.

# सौरऊर्जा निर्मितीसाठी महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार

✔ सुराज्य/सोलापूर

## रूफ टॉप सोलरमधून १३८७ मेगावॅट वीजनिर्मिती

घराच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याच्या रूफ टॉप सोलर योजनेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महावितरणला इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने संस्थेने विजेता जाहीर केले आहे. शुक्रवारी दिल्लीत पुरस्कार प्रदानकरून गौरव केला रूफटॉप सोलर तून १३८७ मेगावॅट वीजनिर्मिती केल्याने हा गौरव केला आहे.

माजी केंद्रीय ऊर्जा सचिव अनिल राजदान, ईआरइडाएचे माजी अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक के.एस.पोपली यांच्याहस्ते महावितरणचे अधीक्षक अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी रूफ टॉप सोलर योजनेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल महावितरणतर्फे पुरस्कार स्विकारला. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी या पुरस्कारासाठी महावितरणच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स या कोलकतास्थित संस्थेची स्थापना १९२५ साली उद्योगपती जी.डी. बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली झाली. देशातील अनेक प्रतिष्ठित व मोठे उद्योगसमूह चेंबरचे सदस्य आहेत. चेंबरने शुक्रवारी नवी दिल्ली येथे हरित ऊर्जेविषयी चर्चा करण्यासाठी आयोजित शिखर परिषदेत हरित ऊर्जा क्षेत्रातील देशभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत विविध वर्गवारीतील पुरस्कार प्रदान करण्यात आले.

घराच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून निर्माण झालेली वीज स्वतः वापरायची आणि जास्त निर्मिती झाली तर महावितरणला विकायची अशी रूफटॉप सोलर', योजना आहे. या योजनेला महावितरणच्या ग्राहकांची पसंती मिळाली आहे. राज्यात २२ फेब्रुवारी पर्यंत रूफ टॉप सोलर बसविणाऱ्या ग्राहकांची संख्या ७९,५६४ झाली होती व त्यांच्याकडून १३८७ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता गाठली गेली होती.




राज्यामध्ये पाच वर्षांपूर्वी २०१६ -१७ या आर्थिक वर्षात घरगुती रूफ टॉपचे केवळ १,०७४ ग्राहक होते व २० मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती क्षमता होती. गेल्या पाच वर्षांत त्यामध्ये मोठी वाढ झाली आहे व १,३८७ मेगावॅटची क्षमता गाठली गेली आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल २०२२ नंतर आतापर्यंत ३५६ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेची भर पडली आहे.